विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ गुरुवार दि. १३ जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२४ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


**सुविचार**

अगर आपको दूसरों के धन्धे में मन लगाने की आदत है तो आपका अपने धन्धे में दिवाला निकल जायेगा ।

# रायबरेली की वायनाड

दिल्ली,१२ - काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी यंदाची लोकसभा निवडणूक दोन मतदारसंघातून लढवली. एक वायनाड, दुसरा मतदारसंघ म्हणजे, रायबरेली. केरळच्या वायनाडमधून सलग दुसऱ्यांदा खासदार म्हणून निवडून आलेले काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बुधवारी जनतेला संबोधित केले. राहुल गांधी यांनी आधी जनतेचे आभार मानले आणि मग कुठून खासदार व्हायचे, असा थेट प्रश्न जनतेलाच विचारला. राहुल म्हणाले की, मी द्विधा मनस्थितीत आहे, मी काय निवडू? रायबरेली की वायनाड? राहुल गांधींचा प्रश्न संपतो न संपतो, तोच समोर उपस्थित असलेल्या लोकांनी एका सुरात उत्तर दिले... वायनाड. त्यानंतर राहुल गांधी म्हणाले, मला तुम्हाला सांगतो की, माझ्या निर्णयावर वायनाड आणि



रायबरेली दोन्ही मतदारसंघातील लोक खूश होतील. मी वचन देतो. तुम्ही दिलेल्या पाठिंब्यासाठी धन्यवाद आणि मी लवकरच तुम्हाला पुन्हा भेटेन.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी यावेळीही सार्वत्रिक निवडणुकीत दोन जागांवरून निवडणूक लढवली. केरळमधील वायनाड आणि उत्तर प्रदेशातील रायबरेली मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि मोठ्या फरकानं दोन्ही मतदारसंघांमधून विजय मिळवला. यापूर्वी २०१४ मध्ये देखील राहुल गांधी यांनी केरळच्या वायनाड आणि उत्तर प्रदेशच्या अमेठी मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. मात्र, अमेठीत त्यांचा पराभव झाला आणि वायनाडच्या जनतेने त्यांना खासदार म्हणून निवडून लोकसभेत पाठवले. यावेळीही त्यांनी दोन जागांवर निवडणूक लढवली आणि दोन्ही जागा जिंकल्या. नियमानुसार, राहुल गांधी एकाच जागेवरून खासदार राहू शकतात. अशा परिस्थितीत त्यांना एका जागेचा राजीनामा द्यावा लागणार आहे.

(पान ७ वर)

# राज्यसभेच्या १० जागा रिक्त

नवी दिल्ली : - देशात लोकसभा निवडणूक पार पडली. नरेंद्र मोदी यांनी देशात तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली आहे. पीएम मोदींशिवाय आणखी ७१ मंत्र्यांनी शपथ घेतली. मंत्रिपदेही विभागली गेली. दरम्यान, लोकसभा निवडणुकीनंतर राज्यसभेच्या १० जागा रिक्त झाल्या आहेत. यामध्ये राज्यातील पियूष गोयल आणि उदयनराजे भोसले यांचा समावेश आहे. त्यांनी लोकसभा निवडणुकीत विजय मिळविला. त्यामुळे त्यांच्या जागा रिक्त झाल्या.

यावेळी अनेक राज्यसभा सदस्यांनी लोकसभा निवडणूक लढवली आणि निवडणूक जिंकून ते लोकसभेत पोहोचले. या स्थितीत राज्यसभेच्या १० जागा रिक्त झाल्या आहेत. यामध्ये राज्यातील दोन जागांचा समावेश आहे. केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी पहिल्यांदाच लोकसभा निवडणूक लढवताना उत्तर मुंबईतून विजय मिळवला. सातारातून उदयनराजे भोसले यांनी विजय मिळविला. रिक्त दोन्ही जागा भाजपच्या कोट्यातील आहेत. त्यामुळे या जागांवर कोणाला संधी दिली जाणार, याची उत्सुकता आहे.

पंकजा मुंडे यांना बीड लोकसभेला अटीतटीच्या लढतीत पराभूत व्हावे लागले. त्यामुळे त्यांना संधी दिली जाणार का याचीहि उत्सुकता आहे. केंद्रीय मंत्रिमंडळात कोकण आणि मराठवाड्याला संधी मिळालेली नाही. त्यामुळे प्रादेशिक समतोल साधण्यासाठी या दोन विभागातून भाजपकडून कोणाला संधी दिली जाते, हे पाहावे लागेल.

लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात (पान ७ वर)

# मविआ चा तिढा सुटला; दोन उमेदवारांचे अर्ज मागे

मुंबई : प्रतिनिधी - विधानपरिषद निवडणुकीच्या जागा वाटपावरून महाविकास आघाडीत तिढा निर्माण झाला होता. शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाने विश्र्वासात न घेता उमेदवार जाहीर केल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला होता. मात्र बुधवारी उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन संवादाचा अभाव झाल्याचे मान्य केले आणि त्यानंतर आता कोकण पदवीधर मतदारसंघातील ठाकरेंच्या शिवसेनेचे उमेदवार किशोर जैन यांनी अर्ज मागे घेतला. तसंच या मतदारसंघातून अर्ज दाखल केलेले राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अमित सरैया यांनीही आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. या दोन्ही उमेदवारांनी काँग्रेस उमेदवार



रमेश कीर यांना आपला पाठिंबा जाहीर केला.

एकीकडे, महाविकास आघाडीतील उमेदवारीचा तिढा सुटत असताना महायुतीलाही बंडखोरांना शांत करण्यात यश आले. कोकण पदवीधर मतदारसंघातून मुख्यमंत्री एकनाथ शार्दिं यांच्या शिवसेनेचे संजय मोरे यांनीमाघार घेतली. त्यामुळे कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपचे निरंजन डावखरे विरुद्ध काँग्रेसचे रमेश कीर असा थेट सामना रंगणार आहे.

काँग्रेस हायकमांड आणि उद्धव ठाकरे यांच्यात झालेल्या चर्चेनंतर काँग्रेसच्याही दोन उमेदवारांनी माघार घेतली आहे. मुंबई शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार प्रकाश सोनावणे आणि नाशिक पदवीधरमधील काँग्रेसच्या दिलीप पाटील यांनीही माघार घेतली.

पदवीधरसाठी २२, शिक्षक (पान ७ वर)

# इंदापूरचा आमदार बदला शरद पवारांसमोर घोषणा

इंदापूर - साहेब तुम्ही इंदापूरचा आमदार बदला, त्याशिवाय आमचे प्रश्न सुटणार नाहीत. इंदापूरात आप्पासाहेब म्हणतील तसंच होणार, अशा घोषणा शेतकऱ्यांनी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यासमोर दिल्या आहेत. शरद पवारांनी आज इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतकऱ्यांचे प्रश्न्न समजून घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी शरद पवार म्हणाले, ४-६ महिने थांबा. मला राज्य सरकार बदलायचे आहे. त्यानंतर शेतकरी म्हणाले की, इंदापूरचा आमदार बदला. त्याशिवाय आमचे प्रश्न सुटणार नाहीत.

दोन एकरचा भाग मंजूर आहे



आणि सहा एकरचे पाणी घेतो, हे थांबले पाहिजे

शरद पवार म्हणाले, माझ्याकडे १० वर्ष देशाच्या शेतीचे काम होते, त्यावेळी कर्जमाफी केली. शेतीमालाचे भाव वाढवून दिले. सत्तेचा वापर लोकांसाठी करायचे असतो. नियमित पाणी आहे, ते मिळायला पाहिजे. माझा दोन एकरचा भाग मंजूर आहे आणि सहा एकरचे पाणी घेतो, हा उद्योग थांबल्याशिवाय तुम्हाला न्याय मिळणार नाही. माझ्या डोक्यात असं आहे की, हा तुमचाच प्रश्न्न आहे असं नाही. आम्ही जाईल तिथे लोक म्हणतात दुधाच्या भावासंबंधी राज्य सरकारपुढे म्हणणे मांडावे लागेल, असे आश्र्वासही शरद पवारांनी दिले.

४-६ महिन्यात राज्य सरकार बदलायचे आहे : शरद पवार

शेतकऱ्यांशी संवाद साधताना शरद पवार म्हणाले, पाणी-चाऱ्या बाबत आता काही करू शकत नाही. मुंबईत गेल्यानंतर सरकारमधील (पान ७ वर)

# लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी करणार भारतीय सैन्याचे नेतृत्व

नवी दिल्ली: केंद्र सरकारने मंगळवारी ११ जूनला लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांची भारतीय सैन्याच्या प्रमुखपदी घोषणा केली आहे. लेफ्टनंट उपेंद्र द्विवेदी याआधी वाईस चीफ ऑफ आर्मी स्टाफ म्हणून कार्यरत आहे. त्यांचा कार्यकाळ ३० जूनपासून सुरू होईल.


विधानानुसार लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी ३० जूनला कार्यभार हाती घेतील. तर सध्याचे सेनाध्यक्ष मनोज सी पांडे त्याच दिवशी आपले पद सोडतील. १ जुलै १९६४मध्ये जन्मलेल्या द्विवेदी यांना डिसेंबर १९८४मध्ये सेनेच्या इन्फंट्रीमध्ये कमिशन मिळाले होते.

या पदांवर केले आहे काम



४० वर्षांपासून ते भारतीय सैन्यात विविध पदांवर कार्यरत आहेत. विविध कमांड, स्टाफ, अनुदेशात्मक आणि परदेशी नियुक्त्यांमध्ये त्यांनी काम केले आहे.

शिक्षण उपेंद्र द्विवेदी यांनी रीवाच्या सैनिक स्कूलमध्ये सुरूवातीचे शिक्षण घेतले. यानंतर नॅशनल डिफेन्स कॉलेस आणि यूएस आर्मी वॉर कॉलेजमधून शिक्षण केले. (पान ७ वर)



**काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री तथा माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर यांची भेट घेऊन त्यांचे शुभाशिर्वाद घेतले. यावेळी श्री. शैलेश पाटील, डॉ.सतीश बिराजदार आणि श्री.श्याम साखरे उपस्थित होते.**

# येणाऱ्या निवडणुकीत जिद्दीने काम करा :आ.कराड



लातूर दि.१२ - लातूर ग्रामीण मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांनी लोकसभा निवडणुकीत अत्यंत चांगले मनापासून काम केले असून या पुढील काळात होणाऱ्या प्रत्येक निवडणुकीतही गावागावातील भाजपा कार्यकर्त्यांनी एकमेकांच्या विचाराने आणि जिद्दीने काम करून भाजपाचे मताधिक्य वाढवण्याचा प्रयत्न करावा असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर तालुक्यातील मौजे रामवाडी ख. येथील ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी दहा लाखाचा आणि मौजे कारेपूर येथील हनुमान मंदिर परिसरात सभा मंडप बांधकामासाठी दहा लाखाचा निधी आपल्या स्थानिक आमदार निधीतून मंजूर केला. सदरील निधी मंजूर केल्याबद्दल दोन्ही गावच्या ग्रामस्थांनी बुधवारी दुपारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात आ. कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले. यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे आणि किसान मोर्चाचे साहेबराव मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

रामवाडी आणि कारेपूर येथील ग्रामस्थांशी संवाद साधताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, रामवाडी हे गाव पूर्वीपासून भाजपाचा बालेकिल्ला (पान ७ वर)

# बोगस खते, बियाणे विक्री रोखण्यासाठी सतर्क राहावे

**लातूर / प्रतिनिधी-** जिल्ह्यात सर्वत्र चांगला पाऊस झाला असून आता खरीप पेरणीला सुरूवात झाली आहे. त्यामुळे बोगस बियाणे, खतांची विक्री होवू नये, यासाठी कृषी विभागाने सतर्क राहून काम करावे. यासाठी भरारी पथके स्थापन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी बुधवारी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात आयोजित कृषी निविष्ठा संनियंत्रण समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी ठाकूर बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आर. टी. जाधव, कृषी विकास अधिकारी सुभाष झोले यांच्यासह उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, कृषी सेवा केंद्र असोसिएशनचे प्रतिनिधी उपस्थित होते.




यावेळी जिल्हाधिकारी ठाकूर म्हणाल्या, पेरणी सुरू झाल्यानंतर बियाणे, खतांची मागणी वाढणार असून या काळात शेतकऱ्यांची अडवणूक, फसवणूक होवू नये, यासाठी खबरदारी घ्यावी. बोगस बियाणे, खतांमुळे शेतकऱ्यांचा पूर्ण खरीप हंगाम वाया जावू शकतो. जिल्ह्यात बोगस बियाणे, खते विक्री होवू नये, यासाठी कृषी विभागाने सतर्क राहावे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तालुकानिहाय पथके स्थापन करून त्यांच्यामार्फत कृषी सेवा केंद्रांची तपासणी करावी, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. आपण स्वतः कृषी सेवा केंद्रांची तपासणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. बोगस बियाणे, खते रोखण्यासोबतच जादा दराने होणारी विक्री रोखणे, लिंकिंग होणार नाही, याचीही काळजी घ्यावी. असे गैरप्रकार करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करावी. शेतकऱ्यांना खतांचा वापर, रासायनिक औषधांच्या फवारणीबाबत (पान ७ वर)

# चंद्राबाबू नायडूं मुख्यमंत्रिपदी


## अभिनेते पवन कल्याण कॅबिनेट मंत्री

विजयवाडा :नुकत्याच झालेल्या आंध्र प्रदेश विधानसभा निवडणुकीत एन. चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देशम पार्टीने बहुमत मिळवलं आहे. टीडीपीने ही निवडणुक प्रसिद्ध टॉलिवूड अभिनेते पवन कल्याण आणि भाजपाबरोबरच्या युतीत लढली होती. बहुमत मिळवल्यानंतर या तीन पक्षांच्या युतीने आज राज्यात सरकार स्थापन



केलं असून चंद्राबाबू नायडू यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. नायडू यांच्याबरोबर अभिनेते पवन कल्याण यांनीदेखील कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. नायडू यांनी चौथ्यांदा आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. तसेच ते या राज्याचे १३ वे मुख्यमंत्री झाले आहेत. विजयवाडा येथील गन्नावरम विमानतळाजवळ केसरपल्ली आयटी पार्कमध्ये आज (१२ जून) सकाळी हा शपथविधी सोहळा पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.

नुकत्याच झालेल्या लोकसभा आणि आंध्र प्रदेश विधानसभा निवडणुकीत राज्यात टीडीपी, जनसेना पार्टी आणि भाजपाने इंडिया आघाडीचा पराभव केला आहे. तसेच (पान ७ वर)

# सकारात्मक विचारांतून यशाचा पासवर्ड मिळतो : कुलगुरू डॉ. चासकर

## कॉक्सिटमध्ये आयटी कंपन्यांत नोकरी मिळालेल्या १३९ गुणवंतांचा सत्कार

लातूर, दि. ७ - जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी नेहमी सकारात्मक दृष्टीने प्रत्येक गोष्टीकडे बघून अपडेट राहण्याचा प्रयत्न करावा, काळानुसार स्वतः ला अपडेट ठेवत गेल्यास यशाचा पासवर्ड मिळतोच, असा विश्वास नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केला.




येथील कॉक्सिट महाविद्यालयातील विविध नामांकित आयटी कंपन्यांमध्ये नोकऱ्या मिळालेल्या १३९ विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचा सत्कार डॉ. चासकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील होते. यावेळी कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. भोसले, डॉ. डी. आर. सोमवंशी, ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव उपस्थित होते.

डॉ. चासकर म्हणाले, कॉक्सिट महाविद्यालय ग्रामीण विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण देऊन जागतिक पातळीवरील नोकरीच्या संधी उपलब्ध करून देत आहे, हे काम कौतुकास्पद आहे. पदवी पूर्ण होण्यापूर्वीच महाविद्यलयातील १३९ विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळवून देणे, त्यांचा पालकांच्या उपस्थितीत सत्कार घडवून आणणे हे काम कौतुकास्पद आहे. पालकांनी आपल्या पाल्यांकडे बारावीनंतरच खरे लक्ष देण्याची गरज आहे. परंतु, हल्ली हे घडत नाही. बारावीनंतर पालक मुलांकडे दुर्लक्ष करून त्याला मोकळे सोडतात, या स्वातंत्र्याचा काही विद्यार्थी गैरफायदा घेतात.

सध्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण सुरू झाले आहे, प्रत्येकाला आपापल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करता येणार आहे. यामध्ये आपण टिकून राहण्यासाठी डोळे व मेंदू उघडा ठेवून जगात काय अपडेट होत आहे, याचा अभ्यास करून सकारात्मक विचारांतून सामोरे जाण्याची गरज आहे.अशा विद्यार्थ्यांना यशाचा पासवर्ड भेटल्याशिवाय राहणार नाही, असे सांगून पुढे ते म्हणाले, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात टिकून राहण्यासाठी शिक्षक व प्राध्यापकांनीही आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्याची गरज आहे. आता पहिल्यासारखा आळस करून जमणार नाही, यापुढील काळात प्रत्येक महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत, त्यांच्यावर विद्यापीठातून नियंत्रण ठेवण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

# क्रिडा संकुल निर्मितीनंतर क्रिडा क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या मुला - मुलींच्या स्वप्नपूर्तीचा मार्ग सुखकर



चाकूर : निवडणुक आचारसंहिता संपताच चाकूरला तालुका क्रीडा संकुल उभारण्यासाठी शासकीय पातळीवर हालचालींना वेग आला आहे. जिल्हा क्रिडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी तीर्थवाडी परिसरातील जमिनीची पाहणी केली. त्यामुळे खेळाडूंची अनेक वर्षापासूनची स्वप्नपूर्ती होणार असल्याची भावना बॉल बॅडमिंटन चे मार्गदर्शक तथा राष्ट्रीय खेळाडू शिवकुमार सोनटक्के यांनी व्यक्त केली आहे.

चाकूर तालुका क्रिडा संकुलाला मागील अनेक वर्षांपासून जमीन मिळत नव्हती. त्यातच क्रिडा संकुल पळवापळवीचे राजकारण खेळाडूंच्या मुळावर उठले होते. चाकूर येथे शासनाची १३ एकर जमीन उपलब्ध असूनही क्रिडा संकुलाच्या जमीनीचा वनवास संपत नव्हता. यासाठी खेळाडू, क्रिडा प्रेमी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक राजकारणी या विषयाकडे गांभीर्याने पहात क्रीडा विभागाचे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करत होते. त्याचीच फलश्रुती म्हणून जिल्हा क्रीडा विभागाने अधिक लक्ष घालून हा प्रश्न कायमचा सोडवण्याचा प्रयत्न चालवला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात क्रीडा संकुलासाठी १३ एकर जागा ही तीर्थवाडी परिसरात उपलब्ध असून ती सध्यस्थितीत पडीक आहे. खेळाडूंच्या दृष्टीने हा भाग पोषक असल्यामुळे जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, तलाठी अविनाश पवार यांनी नुकतीच चाकूर येथील जमीन गट क्रमांक ६०१ ची पाहणी केली आहे. एके काळी बॉल बॅडमिंटन, खो-खो, कबड्डी या खेळातील चाकूरच्या खेळाडूंनी देशपातळीवर क्रिडा क्षेत्रात चाकूरचा दबदबा निर्माण केला होता. क्रिडा संकुल निर्माण झाल्यावर क्रिडा क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या मुला - मुलींचा स्वप्नपूर्ती मार्ग सुखकर होणार आहे.

## श्यामलीला बावगे यांना पुरस्कार

औसा : श्री कपीलधारेश्वर प्रतिष्ठान, लातूर यांच्यातर्फे हासेगाव फार्मसीच्या प्राचार्या डॉ. श्यामलीला बावगे यांना कपिलधारेश्वर शिक्षणरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी अध्यक्ष राजकुमार कत्ते, डॉ. संजयकुमार शिवपुजे, राजकुमार बिडवे, वैजनाथ जायगे, प्रा. राजेश विभुते, नयन राजभाने आदींची उपस्थिती होती. यावेळी राजेश्र्वर डांगे, कमलेश पाटणकर, शैलजा पाटणकर, तेजस बिराजदार यांना सन्मानित केले. याबद्दल भीमाशंकर बावगे, वेताळेश्र्वर बावगे, शिवलिंग जेवळे, नंदकिशोर बावगे यांनी कौतक केले.

# लातूर जिल्हा परिषद गट- क संवर्ग परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

लातूर,/ प्रतिनिधी: जिल्हा परिषदेतंर्गत गट-क संवर्गातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया परीक्षा १३ जून २०२४ ते १६ जून २०२४ या कालावधीत आयोजित केलेली आहे. जिल्ह्यातील तीन उपकेंद्रांवर ही परीक्षा होणार असून या सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्याबाबतचे आदेश प्रभारी अपर जिल्हादंडाधिकारी संगीता टकले यांनी दिले आहेत.

नांदेड रोडवरील कोल्पा येथील सांदिपनी टेक्निकल कॅम्पस, लातूर येथील स्वामी विवेकानंद इन्स्टिटयूट ऑफ पॉलटेक्निक आणि निलंगा येथील महाराष्ट्र कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या उपकेंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आलेली आहे. या परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रवेश करतेवेळी पाच पेक्षा जास्त व्यक्ती एकत्रितरित्या प्रवेश करता येणार नाही. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देता येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परिक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करता येणार नाही. १०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानपट्टी , टायपिंग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील. परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्यूलर फोन, ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असेल.

कोणत्याही व्यक्तीकडून परीक्षा सुरळीतपणे व शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बांधा उत्पन्न करण्यात येणार नाही. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीस अथवा वाहनास प्रवेश मनाई राहील. हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी परीक्षार्थी केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी व पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्याबाबत त्यांच्या परीक्षेसंबंधी कर्तव्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने लागू राहणार नाहीत. १३ जून, २०२४ ते १६ जून, २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील.

# 'श्री कुमारस्वामी'च्या प्राचार्यपदी कुसुम ढोणे

औसा: येथील श्री महंतस्वामी शिक्षण मंडळ संचलित श्री कुमारस्वामी महाविद्यालय प्राचार्यपदी डॉ. कुसुम ढोणे यांची नियुक्ती करण्यात आली. प्राचार्य डॉ. महेश्वर बेटकर हे सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात येऊन निरोप देण्यात आला.

संस्थाध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व सचिव गिरीश पाटील यांनी रिक्त पदावर प्रभारी प्राचार्य म्हणून डॉ. कुसुम ढोणे यांची नियुक्ती केली. यावेळी त्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला सहसचिव सुभाषप्पा मुक्ता, उपप्राचार्य प्रा. डॉ. युवराज धसवाडीकर, प्रा. डॉ. संजय काळे, प्रा.डॉ. कर्मवीर कदम, प्रा. डॉ. प्रकाश कराड, प्रा. डॉ. विजयकुमार माने, प्रा.डॉ. अनिल वाडकर, प्रा. डॉ. जामवंत कदम, प्रा.डॉ. किरण चौधरी, प्रा.डॉ. बालाजी कोकणे, प्रा. डॉ. अनिता ढोले, प्रा. ज्योती भोसले, प्रा. डॉ. बालिका कांबळे आदींसह प्राध्यापक उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यातील ५३६ संशयित क्षयरुग्णांचे फिरत्या व्हॅनद्वारे काढण्यात आले एक्स-रे

लातूर, / प्रतिनिधी- जिल्ह्यातील सर्व संशयित क्षयरुग्णांचे एक्स-रे काढण्यासाठी राज्य क्षयरोग नियत्रंण व प्रशिक्षण केंद्राकडून एक एक्स-रे व्हॅन उपलब्ध करुन देण्यात आली होती. या व्हॅनद्वारे जिल्ह्यात ३ जून ते ८ जून या कालावधीत ५३६ संशयित रुग्णांचे एक्स-रे काढण्यात आले.

जिल्हा क्षयमुक्त करण्यासाठी आरोग्य विभागाच्यावतीने विविध उपक्रम राबिवले जात आहेत. या अंतर्गत क्षयरुग्णांचा शोध घेऊन त्याच्यावंर औषधोपचार केले जात आहेत. दोन आठवड्यांपेक्षा जास्त दिवस खोकला असणे, ताप असणे, वजणात लक्षणीय घट होणे, थुंकीवाटे रक्त पडणे, मानेवर गाठ येणे आदी क्षयरोगाची लक्षणे समजली जातात. त्यामुळे यापैकी कोणतेही लक्षण असले तर तातडीने डॉक्टरांच्या सल्ला घेणे गरजेचे आहे.

एक्स-रे व्हॅनच्या माध्यमातून औसा तालुक्यात (उजनी-३३), लातूर तालुका (जवळा-२५, भातांगळी-२९), जळकोट तालुक्यात (वांझरवाडा-११५, अतनूर-११९), निलंगा तालुक्यात (हलगरा-२१, औराद शहाजनी-५३), शिरुर अनंतपाळ तालुक्यातील ११९ व देवणी तालुक्यात (वलांडी-२२) असे एकूण ५३६ एक्स-रे काढण्यात आले आहेत.

एक्स-रेद्वारे निदान झालेल्या सर्व क्षयरुग्णांना सरकारी दवाखान्यातून मोफत तपासणी व औषध उपचार दिले जातील. तसेच क्षयरुग्णांना उपचार कालावधीत शासनामार्फत प्रतिमहा ५०० रुपये पोषण आहारासाठी दिले जातात.

पुणे येथील राज्य क्षयरोग नियत्रंण व प्रशिक्षण केंद्राचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिरुध्द देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. डी.के रुपनर यांच्या नियोजनानुसार मोबाईल एक्स-रे व्हॅनद्वारे संशयितांचे एक्स-रे करण्यात आले आहेत. तसेच राज्य क्षयरोग नियत्रंण सोसायटीतर्फे चिंतामणी साठे, श्री. गिराम क्ष-किरण तंत्रज्ञ व शशिकांत लोहार यांच्यासह सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षक, एसटीएलएस, टीबीएचव्ही, आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविका यांनी तपासणीसाठी सहकार्य केले.

# दिलासा पुरस्काराला नैतिक अधिष्ठान आहे : दत्तात्र्य मठपती

लातूर / प्रतिनिधी- दिलासा फाऊंडेशन लातूर द्वारा आयोजित विविध क्षेत्रातील गुणवंतांचा दिलासा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा भालचंद्र ब्लड बँक लातूर येथे दिमाखात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजसेवक रवि बापटले हे होते तर प्रमुख अतिथी दत्तात्रय मठपती विभागीय शिक्षण सहाय्यक संचालक लातूर , कालिदास माने संस्थापक अध्यक्ष शि.प्र.सभा (काँग्रेस), श्याम टरके सहाय्यक संचालक (माहिती), ड, प्रवीण पाटील जिल्हाध्यक्ष ला. जि. काँ. विधी विभाग, राणी भोंडवे पोलीस उपनिरीक्षक गंगाखेड, कवी योगिराज माने, दामाजी बालूरे, ॲड. श्रध्दा जवळगेकर युवती जिल्हा प्रमुख, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे. राज्याध्यक्ष शि.प्र. सभा (काँग्रेस)अदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलासाचे संस्थापक अध्यक्ष दयानंद बिराजदार यांनी केले.



यावेळी प्रमुख अतिथी दत्तात्र्य मठपती शिक्षण सह्हायक संचालक म्हणाले की,देश संस्कारमय करण्यात शिक्षकांचा वाटा असून दिलासा पुरस्काराला नैतिक अधिष्ठान आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष रवि बापटले म्हणाले मी शुभेच्छा नाकारतो कारण सेवालय बंद पडल पाहिजे पण दिलासा मोठे झाले पाहिजे वटवृक्ष झाले पाहिजे.माझे होत असलेल कौतुक माझे नसुन सेवालयातील मुलांच आहे. तर संस्थापक अध्यक्ष कालिदास माने म्हणाले, शिक्षकामध्ये समाज बदलण्याची प्रचंड ताकत आहे. त्यांच्या पेशाशी इमान राखणार्यांच जगणं सुंदर आहे. यावेळी श्याम टरके सहाय्यक संचालक (माहिती), ड, प्रवीण पाटील जिल्हाध्यक्ष ला. जि. काँ. विधी विभाग, राणी भोंडवे पोलीस उपनिरीक्षक गंगाखेड, दामाजी बालूरे राज्याध्यक्ष यांची समायोचित भाषणे झाली.

कै. शिवमुर्ती शंकर बिराजदार यांच्या समर्नाथ दिलासा टीचर अवार्ड साठी प्रथम आलेले डॉ. मच्छींद्र नागरे ३००१ रू. सन्मानचिन्ह, द्वितीय द्विष्णू बिरादार यांना २००१ रू सन्मानचिन्ह देवराव घुले यांच्या समर्नार्थ तृतीय जिजाबाई माने. १०५१रू सन्मानचिन्ह तर लिटरेचर अवार्ड प्रदीप लोभे यांच्या समार्नाथ प्रथम राही कदम ३००१ रू. सन्मानचिन्ह , दामोदर दापके यांच्या समर्नार्थ द्वितीय अनुराधा वायकोस २००१ रू सन्मानचिन्ह तृतीय दिगंबर जाधव यांना १०५१ रू सन्मानचिन्ह देण्यात आले. तर दिलासा राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कार २०२४ हे ग्रीन लातूर वृक्ष टीम, उज्वलाबाई कांबळे, सुनीता पाटील, सह्याद्री देवराई लातूर, डॉ. स्वाती फेरे,शिवलिंग नागापुरे,उत्तम शेळके,शोभा भोजने,अपेक्षा डाके,सूर्यमाला मोतीपवळे,शोभा चव्हाण,सह्याद्री देवराई लातूर,गोपाळ भूतापल्ले, ज्योत्स्ना थोरात, बालाजी पुंडे,जीवन व्यंकटराव जाधव, मेघा जगदाळे, शिवशाहीर संतोष साळुंखे,चक्षुपाल कांबळे, आदिना देण्यात आला.

यावेळी सभागृह खचाखच भरले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष दयानंद बिराजदार,उपाध्यक्ष दिलीप लोभे, सचिव यशवंत मस्के, कोषाध्यक्ष प्रमोद जाधव, कार्याध्यक्ष सविता धर्माधिकारी, सचिव सत्यशिला कलशेट्टी, सहकोषाध्यक्ष-सुप्रिया दापके, संपर्क प्रमुख जना घुले, प्रसिध्दी प्रमुख मोहन सावंत, संस्थापक सदस्य महारुद्र डिगे, प्रल्हाद सिरमवाड, कोमल आचार्य, सरस्वती बिराजदार, शिवाजी गायकवाड, वंदना केंद्रे यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन बा. सो. कांबळे यांनी केले तर आभार सत्यशिला कलशेट्टी यांनी मांडले.

# महात्मा बसवेश्वरमध्ये कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या नवोदित गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार

लातूर/ प्रतिनिधी- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसेश्वर महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची प्रवेश प्रक्रिया दि. २८ मे २०२४ पासून स. १० ते साय. ०६ वा. पर्यंत (रविवार व सुट्टीच्या दिवशी सह) कनिष्ठ महाविद्यालयाचे अकरावी कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यवसाय अभ्यासक्रम आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एस.डब्ल्यू. व बी.सी.ए. प्रथम वर्षाचे प्रवेश सुरू झालेले आहेत. याला विद्यार्थी व पालकाकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा पालकांसह पुष्पगुच्छ व पेन देवून सत्कार महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश समितीतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

अकरावी विज्ञान शाखेत आजपर्यंत ९० टक्केच्या वर ०७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. यामध्ये बेल्हाळे श्रुती विकास (९८ टक्के), कुरेशी बुशरा साहेब लाल (९६.६० टक्के), कांबळे प्रतीक्षा शिवाजी (९२.८० टक्के), चव्हाण मानसी मनोज (९२.६० टक्के), प्रयाग रूद्र राजेश (९१.४० टक्के), गदाडे श्रुती प्रभाकर (९१.४० टक्के), पांचाळ वरद प्रवीण (९०टक्के) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

अकरावी वाणिज्य शाखेत आजपर्यंत ८० टक्केच्या वर ०८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये नाईकवाडे आयोध्या बाळासाहेब (८९.६० टक्के), मोठेराव तुळशी लक्ष्मण (८९.६० टक्के), जाधव स्वप्नांजली अंबादास (८६.८० टक्के), वाघमारे अंकिकेत उमाकांत (८६.६० टक्के), लोंढे अनिकेत बालाजी (८४.०० टक्के), गथाडे स्वीटी अंबादास (८२.६० टक्के), घोडके ऋषिकेश बालाजी (८२.४० टक्के), यादव अमर सतीश (८१.६० टक्के) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

अकरावी कला शाखेत (८० टक्के) च्या वर ०४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. पठाण अवेदखा अमजदखा (८९.८० टक्के), कांबळे सायली गोरखनाथ (८३.८० टक्के), स्वामी काशिनाथ सोमनाथ (८०.४० टक्के), कूकर स्नेहल नर्सिंग (८०.२० टक्के) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. वरिष्ठ महाविद्यालयात बी. ए. प्रथम वर्षाला ११ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये आळंदकर राधा (७९.०० टक्के), आळंदकर शुभांगी (७१.८३ टक्के) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.


बी. कॉम. प्रथम वर्षाला ३२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये राठी नितल (८४.१७ टक्के), मेनशेट्टी आदिती (८०.६७ टक्के) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. बी. एस्सी. प्रथम वर्षाला ११ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये कुरील प्रीती (७२.१७ टक्के) या विद्यार्थ्याथिणीचा समावेश आहे. बी.एस.डब्ल्यू. प्रथम वर्षाला ०८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये माने आकांक्षा (७५.३३ टक्के), येणके वैष्णवी (७३.३३ टक्के), रामपुरे सनिका (६९.६७ टक्के) या विद्यार्थ्यांचा समावेश असून यामध्ये हासेगाव येथील सेवालयातील दोन विद्यार्थ्यांनीचा समावेश आहे.

बी.सी.ए. प्रथम वर्षाला ०४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.या सर्व प्रवेशीत गुणवंत विद्यार्थी व पालकांचे श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील (तपसेचिंचोलीकर), संस्थेचे सचिव ड माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडीगावे, संचालक राजेश्वर बुके, संचालक बस्वराज (राजू) येरटे, संचालक काशिनाथ साखरे, संचालिका ललिता पांढरे, संचालक राजेश्वर पाटील, संचालक बाबुराव तरगुडे, संचालक प्रभूप्पा पटणे, संचालक गुरुलिंग धाराशिवे आणि संचालक डॉ महेश हालगे यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रवेश समितीमध्ये डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ. सदाशिव दंदे, डॉ. यशवंत वळवी, डॉ. आनंद शेवाळे, डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. रमेश तडवी, डॉ. मनोहर चपळे, प्रा. धोंडीबा भुरे, डॉ. शितल येरूळे यांचा समावेश असून शिक्षकेतर कर्मचारी म्हणून यशपाल ढोरमारे, संजय सोनवणे, केशव घंटे, रघु शिंदे, महादेव कोरे, जगन्नाथ येंचवाड, राम पाटील, नरेश वाडकर आणि अनिल कोळे हे उत्कृष्ट पद्धतीने कार्य करीत आहेत. कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रवेश समितीमध्ये उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, प्रा. वनिता पाटील, प्रा. नितीन वाणी, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. रविंद्र सोनवणे, प्रा. कल्पना गिराम, डॉ. घनश्याम ताडेवार, प्रा. व्यंकट दुडीले आणि प्रा. दयानंद टेंकाळे यांचा समावेश असून शिक्षकेतर कर्मचारी म्हणून नामदेव बेंदरगे, रघु शिंदे, दत्तात्रय पांचाळ, आनंद खोपे आणि राजाभाऊ बोडके हे उत्कृष्ट पद्धतीने कार्य करीत आहेत.

# शेतकऱ्यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा : मिलिंद घारड

शिराढोण : महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने शेतकऱ्यांच्या सोयीसाठी विविध आकर्ष योजना सातत्याने राबविल्या जातात. या सर्व योजनांचा शेतकरी बांधवांनी नियमित लाभ घ्यावा आणि आपले व आपल्या परिवाराचे जीवन सुखकर बनवावे असे प्रतिपादन महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अध्यक्ष मिलिंद घारड यांनी केले.

महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने दि. ५ जून ते दि. १५ जून २०२४ या कालावधीत महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार , दि. ११ जून रोजी या यात्रेचे आगमन कळंब तालुक्यातील शिराढोण येथे झाले. शिराढोणमध्ये या यात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी ओमसाई मंगल कार्यालयात झालेल्या कार्यक्रमास बँकेचे सरव्यवस्थापक डी. एम. कावेरी , लातूरचे विभागीय व्यवस्थापक अविनाश कामतकर, टीम विकासचे प्रमुख बाळासाहेब घोगरे, नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी चैतन्य गोखले , शिराढोणच्या सरपंच लक्ष्मीबाई दिलीप म्हेत्रे, नॅचरल शुगरचे संचालक पांडुरंग आवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य शहाजीराव पाटील, उद्योजक उत्कर्ष संगवे , सौ. कांचनमाला संगवे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.




महाराष्ट्र ग्रामीण बँकेमार्फत शेतकरी, महिला बचत गट, व्यापारी व उद्योजक, व्यावसायिक, गृह व व्यक्तिगत कर्ज वाटप केले जाते. शेतीसाठी पीक कर्ज किसान क्रेडिट कार्ड या योजनेमार्फत बँकांकडून उपलब्ध आहे. केंद्र सरकार व राज्य शासनाच्या वतीने शेतकरी बांधवांसाठी किसान क्रेडिट कार्ड रुपये तीन लाख पर्यन्त कर्जासाठी व्याज परतावा योजना लागू आहेत. माहिती व तंत्रज्ञान युगात योग्य माहिती नसल्यामुळे शासनाच्या व बँकाच्या योजनांचा लाभ मिळत नाही अथवा अर्धवट माहितीमुळे अशा लाभापासून शेतकऱ्यांना वंचित राहावे लागते. शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती पथनाट्याच्या माध्यमातून सोप्या पद्धतीने सांगण्यासाठी सदर महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रा काढण्यात आली आहे. या यात्रेच्या माध्यमातून बँक डिजिटलायझेशन बाबत प्रत्येक ग्रामीण नागरिकांना माहिती दिली गेली. त्या अनुषंगाने आर्थिक वित्तीय साक्षरता , वृक्षारोपण करण्यात आले. त्याचप्रमाणे यावेळी मान्यवरांच्या हस्ते नियमित कर्जदारांचा सत्कारही करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना बँकेचे अध्यक्ष मिलिंद घारड यांनी या यात्रेचा मूळ उद्देश्यच शेतकऱ्यांपर्यंत पोहचून त्यांना बँकेच्या वतीने त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती सोप्या पद्धतीने देणे हा असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांच्या प्रत्येक खात्यासाठी बँकेकडे योजना आहेत. त्याचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या शाखेस भेट द्यावी. आजच्या काळात केवळ शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह शक्य नाही. त्याकरिता जोडधंद्यासाठी अर्थसहाय्य करण्यास आपली बँक सदैव तत्पर आहे. महिला बचत गटांनाही कर्जपुरवठा करण्यास आम्ही तयार असल्याचे घारड यांनी स्पष्ट केले. यावेळी नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी चैतन्य गोखले , सौ. कांचनमाला संगवे यांनीही आपले विचार व्यक्त केले. यावेळी सचिन माने, अनिरुद्ध जोशी, ईश्वर शेळके यांनी पीक कर्जाची आवश्यकता, वित्तीय साक्षरता , अपघाती जीवन विमा याविषयी माहिती देणारे पथनाट्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जगदीश जोशी यांनी तर आभार प्रदर्शन लातूरचे विभागीय उपव्यवस्थापक माधव पालेपाड यांनी केले.

यशवंत धाराशिव जिल्हा

गुरूवार दि. १३ जून २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## माजी आमदार पाटील यांनी पर्यायी रस्ता करण्यास पाडले भाग



परंडा दि.१२ (प्रतिनिधी) – परंडा बार्शी रोडवर दुध डेअरी समोर नवीन पुलाचे काम चालु आहे.  परंडा तालुक्यात तीन दिवस रात्रंदिवस पाऊस कोसळत आसल्याने व ठेकेदाऱ्याच्या हलगर्जीमुळे तो पुल खचून वाहून गेला.  पुल खचल्यामुळे परंडा – बार्शी रोडची वाहतूक बंद पडली. वाहतूक बंद असल्याची माहिती माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांना माहिती मिळताच घटना स्थळाची पहाणी करून सार्वजनिक बांधकाम विभागाला तत्काळ पर्यायी रस्ता करण्याचा सूचना त्यांनी दिल्या. त्यामुळे लगेचच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी  पर्यायी रस्ता उपलब्ध करून दिला. यावेळी शिवसेना शहर प्रमुख रईस मुजावर, नंद शिंदे आदींसह नागरीक उपस्थित होते.

# अंतरवली सराटीहून फोन व जिल्हाधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने मराठा आंदोलन स्थगित

## जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयावर चढून आंदोलन







धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे यांनी पुन्हा आमरण उपोषणाचे अस्त्र उपसले आहे. उपोषणाचा आजचा पाचवा दिवस असून त्यांची प्रकृती खालावल्याने धाराशिव येथील आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालय व तहसील कार्यालयावर चढून आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. मात्र शेवटच्या क्षणी अंतरवली सराटीरीहून सरपंच पांडुरंग तारक यांचा आलेला फोन व जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे यांनी आंदोलकांसोबत केलेली यशस्वी मध्यस्थी यामुळे हे आंदोलन दि.१२ जून रोजी तात्पुरते स्थगित करण्यात आले.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे यांनी अंतरवली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांची प्रकृती खालावल्यामुळे संतप्त झालेल्या मराठा बांधवांनी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास आंदोलन करुन जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन दिले. त्यानंतर दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास जिल्हाधिकारी व तहसील या कार्यालयावर अमोल जाधव, अक्षय नाईकवाडी, अभिजित सुर्यवंशी, तेजस बोबडे, प्रकाश पाटील, मनोज जाधव आदींनी चढून मराठा समाजाला आरक्षण द्यावे, सगेसोयरे याचा आदेश काढावा यासह इतर मागण्यासाठी राज्य सरकार विरोधात प्रचंड घोषणाबाजी केली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांना आरक्षण देण्याची इच्छा नाही. अजून किती मराठ्यांचे बळी हवे आहेत ते तरी सांगावे असे सांगत सायंकाळी ५ वाजेपर्यंत सगे सोयऱ्यांचा आदेश आम्हाला दाखवावा किंवा द्यावा असा इशारा या आंदोलकांनी जिल्हा प्रशासनाला दिला. आम्ही कुठेही उडी टाकून आत्मदहन करणार असल्याचे सांगताच जिल्हा प्रशासनाची एकच धावाधाव सुरू झाली. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व यंत्रणांना सतर्क करीत या आंदोलकावर बारकाईने लक्ष ठेवण्याचे आदेश दिले. त्यामुळे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वृषाली तेलोरे यांनी लागलीच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित केली. आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ज्या ध्वजासमोर उभे राहून घोषणाबाजी करत होते अगदी त्याच्या खालील बाजूस जाळी बांधून यंत्रणा सज्ज केली. आंदोलकांनी वरुन खाली जमिनीवर उड्या टाकू नयेत यासाठी जिल्हाधिकारी, निवासी जिल्हाधिकारी व पोलीस प्रशासनाने वारंवार आंदोलकांशी चर्चा केली. मात्र आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने जिल्हाधिकारी परिसरात नागरिक मोठ्या संख्येने जमले. त्यामुळे या परिसरास यात्रेचे स्वरूप निर्माण झाले होते. आंदोलकांनी मराठ्यांना आरक्षण मिळालेच पाहिजे, देत कसं नाय, घेतल्याशिवाय राहत नाय, सगेसोयरे याचा सरकारने तातडीने आदेश काढावा, लढेंगे जितेंगे हम सब जरांगे, जरांगे यांच्या जीवाला काही कमी जास्त झाले तर त्याला मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री जबाबदार असतील, आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी आणखी किती बळी हवे आहेत ? या स इतर घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. तर त्यांना खाली उतरविण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, नायब तहसिलदार प्रविण पांडे यांनी सातत्याने त्यांच्याशी संपर्क साधून आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले. मात्र आंदोलन कोणाचेही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. पावणे पाच वाजण्याच्या सुमारास जिल्हाधिकारी डॉ. ओंबासे यांनी स्वतः आंदोलकांजवळ जाऊन त्यांच्याशी याबाबत सविस्तर बातचीत केली. जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, तहसिलदार डॉ. मृणाल जाधव, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वृषाली तेलोरे, नायब तहसिलदार प्रविण पांडे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी तगडा बंदोबस्त ठेवला होता.

### अन् जिल्हा प्रशासनाने सोडला श्वास !

**दुपारी १२ वाजल्यापासून सुरू असलेले आंदोलन सायंकाळी पाच वाजेपर्यंत सुरू राहिले. या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून जिल्हा प्रशासनाने सर्व मार्गांचा केला. मात्र आंदोलकांनी कुठलाही अनुचित प्रकार न करता शांततेत आंदोलन पार पाडल्यामुळे जिल्हा प्रशासनाची वाढलेली डोकेदुखी व वाढता ताण किती काळ राहतो ? यामुळे प्रशासनाची प्रचंड तारांबळ झाली. मात्र आंदोलन सुरळीत पार पडल्यामुळे प्रशासनाने देखील ताणतणावामध्ये घेतलेला श्वास सोडला.**

**यावेळी शासनाकडून कुठलाही प्रतिसाद येत नसल्याने आम्ही आत्मदहन करणार असा निर्वाणीचा इशारा सायंकाळी ४.५० वाजण्याच्या सुमारास दिला. यावेळी आंतरवली सराटी येथील सरपंच पांडुरंग तारक यांचा फोन आला. त्या फोनवर आंदोलक अमोल जाधव हे बोलले तर जिल्हाधिकारी डॉ ओंबासे यांनी देखील आंदोलकांशी चर्चा केली. त्यामुळे त्यांचे मन परिवर्तन होऊन समाधान झाल्यामुळे त्यांनी आंदोलन तात्पुरते स्थगित करीत असल्याचे जाहीर केले.**

## जादा रकमेचे आमिष दाखवून १३ लाख ६ हजाराला लावला चुना



धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – जादा परतावा देण्याचे आमिष दाखवून व बोगस मार्केटचे ॲप घेण्यास भाग पाडून एका भामट्या महिलेने स्वतःची ओळख लपवून वेगवेगळ्या बँकेच्या खात्यावर ९ वेळा पैसे भरण्यास भाग पाडले. या माध्यमातून त्या व्यक्तीस तब्बल १३ लाख ६ हजार रुपयांना चुना लावल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, धाराशिव तालुक्यातील पळसप येथील आण्णासाहेब बाबासाहेब शेलार, वय (४५ वर्षे ह.मु. जुनी गल्ली धाराशिव यांना पळसवाडी व धाराशिव येथे असताना मोबाईल धारक ८८२७१४९२४० दिया यांनी स्वत: ची ओळख लपवून फिर्यादी यांना बोगस मार्केट प घेण्यास लावून दि. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान ते दि. १८ मे २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास ९ वेळा पैसे भरण्यास लावून  फिर्यादी व फिर्यादीच्या पत्नी यांच्या बॅक खात्यावरुन वेगवेगळ्या बॅक एस बी आय खाते क्र. ०००००४२९०७२१३८८२ चा धारक, एसबीआय बॅक खाते क्र. ४२८९८९४८७०० चा धारक, एसबीआय बॅक खाते क्र. ४१८७२८२६५६३ चा धारक, महाराष्ट्र बॅक खाते क्र. ६०४८४२०६४१३ खात्यावर पैसे भरण्यास सांगून जादा पैशाचे अमिष दाखवून १३ लाख ६ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केली. या प्रकरणी आण्णासाहेब शेलार यांनी दि. ११ जून रोजी दिलेल्या तक्रारीवरून सायबर पोलीस ठाण्यात भा.द.वि.सं. कलम ४२० सह ६६ सी, ६६ डी माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## विद्युत पुरवठा सुरळीत करा अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन – पाटील



परंडा दि.१२ (प्रतिनिधी) – शहरातील विद्युत पुरावठा मागील काही दिवसांपासून विस्कळीत झालेला आहे. पाऊस कमी प्रमाणात आला तरीही विद्युत वितरण कंपनीचा विद्युत पुरवठा व्यवस्थित होत नाही. तसेच परंडा शहरामध्ये छोटे व्यवसायिक व परंडा शहरातील गोर गरीब जनतेस याचा त्रास रात्री अपरात्री दिवसा लाईट नसल्यामुळे होत आहे. त्यामुळे आपल्या कार्यालयाने याची दखल घेवून विद्युत पुरवठा लवकरात लवकर सुरूळीत करावा. अन्यथा शिवसेना स्टाईल आंदोलन करावे लागेल. त्या होणाऱ्या सर्व परिणामांची जबाबदारी आपणावर राहील असा इशारा माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे.

यावेळी शहरप्रमुख रईस मुजावर, माजी उपनगरध्यक्ष इस्माईल कुरैशी, जनार्धन मेहेर, बाबूराव गायकवाड, माजी नगरसेवक अनिल शिंदे, डॉ. अब्बास मुजावर, माजी नगरसेवक मकरंद जोशी, इरफान शेख, संजय कदम, बाजार समिती संचालक ॲड. अनिकेत काशीद, प्रशांत गायकवाड, तुकाराम गायकवाड, संतोष गायकवाड, रफिक मुजावर, दत्ता मेहेर, उमेश परदेशी, सचिन शिंदे, दत्तात्रय धनवे, मजहर देहलूज, साबेर मुजावर, कासीम तुटके, गजेंद्र गायकवाड, तय्यब मुजावर, लतीफ शहा, सलमान शेख, वसीम मोमीन, जाहीद मोमीन, सलिम मुजावर, शाहरूख मुजावर, लाला मुजावर, तौफीक मुजावर, एजाज मुजावर, बाळाभाई, वाजीद चौधरी, फरीद शेख , विकास साळुंके, ओंकार गायकवाड, आजिम मुजावर, राजा पाटील, पिल्लू पाटील आदींसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थाना मोफत मृदंग व वारकरी सांप्रदायिक शिक्षणासाठी प्रवेश

धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – तालुक्यातील येडशी येथील श्री संत रामकृष्ण भगवान भाऊ, परमेश्वर महाराज (आश्रम) मंदिर व मृदंगाचार्य जालिंदर (बप्पा) सस्ते वारकरी सेवा मंडळ संचलित वारकरी शिक्षण संस्था व संगीत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२४–२५ या वर्षासाठी मोफत १० विद्यार्थ्यांना मृदंग वादन व वारकरी संप्रदायातील भजन, हारिपाठ, दिंडी पाऊले व गीतापाठ आदींचे शिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती आश्रम संस्थानचे धार्मिक कार्यक्रम प्रमुख व सस्ते (बप्पा ) वारकरी शिक्षण संस्थेचे सचिव महादेव जालिंदर सस्ते गुरुजी यांनी केले आहे. दरम्यान, मृदंग वादन व वारकरी शिक्षण  दिले जाते. यामध्ये शालेय व वारकरी सांप्रदाय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या व शाळा सोडलेल्या  विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्यांना पारंपारिक संस्कार, सामाजिक हित व स्वावलंबनाचे ही शिक्षण या विद्यार्थ्यांना दिले जाते. हे विद्यार्थ्यास निवासी गुरुकुल पद्धतीने प्रवेश देऊन त्यांचे निवास, भोजन, कला शिक्षण देण्याचे व्यवस्थापन व शैक्षणीक हित पाहिले जाते. दरवर्षाप्रमाणे रिक्त जागांवर प्रवेश प्रक्रिया सुरू असून इच्छुकांनी ३०  जुनपर्यंत किवा ९४२०२०११९५ यावर संपर्क साधावा असे आवाहन सस्ते यांनी केले आहे.



# धाराशिवच्या बसस्थानकातील समस्येबाबत आ. कैलास पाटील आक्रमक



धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – राज्य परिवहन महामंडळाच्या महाव्यवस्थापक (बांधकाम) यांना बस स्थानकात असलेल्या समस्या सांगत आजपासून ही कामे लवकर करून प्रवाशांना काही प्रमाणात सुविधा निर्माण करून देण्याच्या सूचना आमदार कैलास पाटील यांनी दि.१२ जून रोजी केल्या. या भेटीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून तातडीने काम हाती घेतल्याच दिसत आहे.

धाराशिव येथील बस स्थानकामधील प्रवाशांच्या गैरसोयीच्या तक्रारी आल्यानंतर आ पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देऊन समस्यांची माहिती घेतली. प्रवाशी मंडळींना विचारणा केली व याबद्दल त्यांना आश्वस्थ केले. धाराशिव येथील मध्यवर्ती बस स्थानकाचे सध्या बांधकाम चालू करण्यात आले आहे. पुर्वीचे स्थानक पाडण्यात आले आहे.  त्यामुळे सध्या स्थानकाची सेवा पुर्णपणे कोलमडलेली आहे. बांधकाम संथगतीने चालू असून ते वेळेत पुर्ण होण्यासाठी बांधकाम तत्परतेने पूर्ण करण्याच्या सुचना गुत्तेदाराला देण्यात याव्यात तसेच  सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. तिथे सगळीकडे पाणी साचून खड्डे पडले आहेत. प्रवाशांना निवारा शेडची देखील सुविधा अपुरी आहे. शिवाय सगळीकडे मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने शौचालयाची सुविधा करणे आवश्यक आहे. प्रवाशांच्या सुविधापेक्षा उपहारगृह व गुत्तेदार यांच्या सुविधाकडे अधिक लक्ष दिल्याचे दिसून येत आहे. या सर्व गैरसोयी टाळण्यासाठी एस.टी. स्टॅंडचे बांधकाम पुर्ण होईपर्यंत बस स्थानक इतरत्र स्थलांतरीत करणे आवश्यक आहे. धाराशिव येथील मध्यवर्ती बस स्थानकात प्रवाशांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी बस स्थानक बांधकाम पुर्ण होईपर्यंत इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत योग्य तो  निर्णय घ्यावा अशा सूचना महाव्यवस्थापकांना दिल्या आहेत. ज्या अधिकारी लोकांना सूचना देऊनही त्यांनी त्याचे पालन केलेले नाही, त्यांच्यावर कारवाई करावी अशा देखील सूचना आ पाटील यांनी दिल्या आहेत. आ पाटील यांनी स्थानकाला भेट दिल्याने तातडीने दखल  घेण्यात आली. आज ताबडतोब कामाला सुरुवात करून समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्यात आला आहे. यापुढेही या बस स्थानकाकडे आपले लक्ष असणार आहे. त्यामुळे कोणीही हलगर्जीपणा करू नये. अन्यथा कोणाचीही गय केली जाणार नाही असे वक्तव्य यांनी व्यक्त केले.



# संपादकीय

## दहशतवादाचे आव्हान

पाकिस्तानातील राज्यकर्त्यांच्या अस्तित्वासाठी काश्मीरचा प्रश्न निर्माण झाला. भारताकरता व्याप्त काश्मीर परत घेणे एवढाच भाग आहे. व्याप्त काश्मीरमध्ये भारताला अनुकूल बदल घडत असताना पाकिस्तानप्रणित दहशतवादी कारवाया वाढणार, हे गृहीत धरावे लागेल.

जम्मू-काश्मीरमधील रियासी येथे भाविकांच्या बसवर दहशतवादी हल्ला झाला. यामध्ये दहा जणांना प्राण गमवावे लागले. जम्मू-काश्मीरला पडलेला हिंसाचाराचा विळखा काहीसा सैल झाला असेल; मात्र तो पूर्णपणे सुटलेला नाही, हे या घटनेतून पुन्हा एकदा समोर आले आहे. नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या शपथविधीच्या दिवशीच हा हल्ला घडविण्यात आला. दहशतवाद्यांच्या पाठीमागे असलेल्या शक्तींनी हल्ल्यासाठी निवडलेला दिवस नव्या सरकारला संदेश देण्यासाठीच होता, यात शंका नाही. अबू हमजा आणि त्याचा आणखी एक साथीदार, यांनी तो घडविल्याचे तपासात पुढे आले आहे. दोघेही परकीय असून याआधी राजौरी आणि पूंछमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये त्यांचाच हात होता, असे सुरक्षा यंत्रणेकडून सांगण्यात येते. जम्मू-काश्मीरसाठी असलेले ३७०वे कलम मोदी सरकारच्या आधीच्या कार्यकाळात रद्द करण्यात आले. जम्मू-काश्मीरचे वेगळेपण जपण्याऐवजी फुटिरतावाद पसरविण्यासाठी त्या कलमाचा वापर झाला. ते करण्यात अग्रभागी असलेल्या तेथील राजकीय नेत्यांच्या बरोबरीने पाकिस्तानही अस्वस्थ झाला. त्यातच अलीकडच्या काळात व्याप्त काश्मीरमधून पाकिस्तान सरकार आणि पाकिस्तान लष्कर यांना विरोध वाढत चालला आहे. तेथील नागरिकांचा रोष एवढ्या टोकाला पोहोचला आहे, की रस्त्यावर उतरुन आंदोलन, निदर्शने होत आहेत आणि सीमा खुली करण्याची मागणी केली जात आहे. अन्यवेळी सीमेपलीकडील काश्मीरमधील निदर्शने, आंदोलने याचा आनंद आणि त्याचा फायदा घेत आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतविरोधात गरळ ओकण्यात पाकिस्तान पुढे होता.

**फुटिरतावादाचे समर्थन–**

व्याप्त काश्मीरमध्ये निदर्शनांना सुरुवात झाल्यावर जम्मू-काश्मीरमध्ये हिंसाचाराच्या घटनांमध्ये सातत्य राखणे ही त्या देशाची गरज बनली आहे. यातूनच जम्मू-काश्मीरमधील हिंसाचार पूर्णपणे रोखता येणे आव्हानात्मक बनत गेले आहे. हिंसाचारात अधिकाधिक जीवितहानी व्हावी, म्हणूनच प्रवाशांच्या बसला लक्ष्य करण्यात आले, हे उघड आहे. शिवखोरी मंदिरातून सर्व भाविक वैष्णोदेवी मंदिराकडे निघाले होते. काही काळापूर्वी पूंछमधील डेरा की गली या परिसरात दहशतवाद्यांनी जवानांच्या ताफ्यावर हल्ला केला होता. त्या ताफ्यातील रायफलींचा वापर रियासीत हल्ला करताना करण्यात आल्याचा संशय आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये शांतता निर्माण झाली नसली तरी पर्यटकांची पावले पुन्हा तेथे वळली, ही वस्तुस्थिती. ती फुटिरतावाद्यांना खटकणारी असल्याने अशा हल्ल्यांचा धोका पुढच्या काळातही कायम राहतो, हे लक्षात घ्यावे लागेल. स्थानिक नेत्यांपैकी अनेक जण पाकिस्तानच्या सुरात सूर मिळविणारे, हे जम्मू- काश्मीरमध्ये कमी-अधिक प्रमाणात कायम राहिलेले चित्र. यामुळे सर्वाधिक जबाबदारी येते ती सुरक्षा दलांवर. राजकीय इच्छाशक्ती, स्थानिक नागरिकांचे सहकार्य आणि सुरक्षा दलांची दक्षता हे सर्व एकत्र येते तेव्हाच आव्हानातून मार्ग काढता येतो. जम्मू-काश्मीरमध्ये तसे नाही. ज्यांना जम्मू-काश्मीरमधील प्रमुख नेते मानले जाते त्या पीडीपीच्या मेहबूबा मुफ्ती, नॅशनल कॉन्फरन्सचे उमर अब्दुल्ला यांचा लोकसभा निवडणुकीत दारुण पराभव झाला. हे दोघे बरे म्हणता येतील असा अपक्ष उमेदवार अब्दुल रशीद तेथे निवडून आला आहे. फुटिरतावादाचे उघड समर्थन त्याच्याकडून केले जाते. बारामुल्ला मतदारसंघातून उमर अब्दुल्ला यांना पराभूत करून तो निवडून आला आहे. याचाच अर्थ मतदानाच्या वाढलेल्या टक्केवारीवर काश्मीरमधील शांतता ठरणार नाही, हे स्पष्ट झाले. काश्मीर खोऱ्यात पूर्वी दहशतवाद्यांचे हल्ले अधिक प्रमाणात होत होते. पूंछ आणि राजौरी या भागात हल्ल्यांची संख्या वाढली असून घुसखोरीला आळा बसलेला नाही, हे त्यातून दिसते. सर्वसामान्य नागरिकांची सहानुभूती दहशतवाद्यांना मिळू नये यासाठी केंद्राने संवादावर भर देणे आवश्यक आहे. त्याचवेळी दहशतवाद्यांबाबत कठोर भूमिका ठेवून त्यांचा पूर्ण बीमोड, हेच उद्दिष्ट ठेवावे लागेल.

# मोदींचे मंत्रिमंडळ

एनडीएतील मित्रपक्षांना महत्त्वाच्या खात्यांपैकी काही विभागांची जबाबदारी मिळेल, ही चर्चा फोल ठरली आहे. गृह, संरक्षण, अर्थ, परराष्ट्र, रेल्वे अशी सर्व महत्त्वाची खाती भाजपकडेच राहिली आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मंत्रिमंडळात ७१ जणांना स्थान दिले आहे. बहुमतासाठी मित्रपक्षांवर संपूर्ण भिस्त ठेवावी लागणार असली तरी, भाजप झुकला हा संदेश जाणार नाही याची मात्र पूर्ण दक्षता घेतल्याचे मंत्रिमंडळाची रचना, शपथविधी सोहळा आणि खातेवाटप यातून दिसते. कॅबिनेट मंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्यात आधी भाजपच्या ज्येष्ठांनी शपथ घेतल्यानंतरच कुमारस्वामी आणि तेलुगू देशम, संयुक्त जनता दल यांच्या नेत्यांना स्थान देण्यात आले. अपेक्षेप्रमाणे अमित शहा, नितीन गडकरी, राजनाथसिंह यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला. गृह आणि सहकार ही खाती अमित शहांकडे कायम ठेवण्यात आली आहेत. राजनाथ, नितीन गडकरी यांच्यासह निर्मला सीतारामन, डॉ. एस. जयशंकर यांची खातीदखील कायम राहिली आहेत. महत्त्वाचे विभाग आपल्याकडेच ठेवून भाजपने नव्या सरकारमध्ये आपलेच वर्चस्व राहील, हे मित्रपक्षांना सूचित केले आहे. लोकसभा निवडणुकीतील भाजपच्या पीछेहाटीची सर्वाधिक जबाबदारी पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांची आहे, असा सूर उमटला होता. भाजपला आता संघाची गरज नाही' या ऐन निवडणुकीतील त्यांच्या विधानाने पक्षाला फटका बसला. तरीही त्यांच्यावर मोदी-शहांचा विश्वास कायम असल्याचे मंत्रिमंडळातील त्यांच्या समावेशाने स्पष्ट झाले. आरोग्य मंत्रालयाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. नड्डा यांच्या जागी नवे अध्यक्ष म्हणून शिवराजसिंह चौहान यांच्या नावाची चर्चा होती. मात्र चौहान यांना मंत्रिमंडळात घेऊन कृषी आणि ग्रामविकास ही महत्त्वाची खाती त्यांना देण्यात आली.



**नव्या चेहऱ्यांना संधी–**

मोदींच्या जुन्या सहकाऱ्यांबरोबर मंत्रिमंडळात अनेक नवे चेहरे आहेत. शिवसेनेच्या शिंदे गटाने सात जागा मिळविल्या. जागांच्या तुलनेत शिंदे गटाला कॅबिनेट मंत्रिपद अपेक्षित होते. त्याऐवजी शिंदे गटाच्या प्रतापराव जाधव यांची राज्यमंत्री पदावर बोळवण करण्यात आली आहे. भाजपचा हा निर्णय शिवसेना शिंदे गटात अस्वस्थता निर्माण करणारा ठरणार आहे. चिराग पासवान यांच्या लोकजनशक्ती पक्षाच्या चार जागा असताना कॅबिनेट मंत्रिपद, अवघी एक जागा जिंकणाऱ्या अपना दलाच्या अनुप्रिया पटेल आणि एचएएमच्या जितनराम मांझी यांनाही संधी, मग शिंदेंच्या शिवसेनेच्या बाबतीत दुजाभाव का? असा सवाल करण्यात येत आहे. राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाने केवळ एक जागा जिंकली; मात्र कॅबिनेट मंत्रिपदाचा आग्रह धरला. तो भाजपच्या ज्येष्ठांनी जुमानलेला नाही. मुख्य पक्षातून फुटलेले आणि आज घडीला अधिकृत असलेले हे दोन्ही पक्ष जुन्या सहकाऱ्यांसोबत जाऊ शकत नाहीत, हे उघड आहे. त्यांची झालेली अडचण शिवसेना उद्धव गट आणि शरद पवारांची राष्ट्रवादी यांच्यासाठी कुचेष्टेचा विषय ठरली नसती तरच नवल!

महाराष्ट्रातून सहा जणांना मिळालेली संधी, खासदार होताच राज्यमंत्री पदावर झालेली मुरलीधर मोहोळ यांची निवड ही मोदी मंत्री मंडळाची आणखी वैशिष्ट्ये.

महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीचे संदर्भ त्या मागे आहेत.

रामदास आठवले यांना पुन्हा संधी मिळण्यामागेही तेच कारण दिसते. मोहोळ यांच्यासह प्रथमच निवडून आलेल्या ३३ जणांना मोदी यांनी मंत्री मंडळात स्थान दिले आहे. मंत्रिमंडळात सात महिलांना संधी मिळाली आहे. मंत्रिमंडळ राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे असले तरी ६१ नेते भाजपचे आणि ११ मित्र पक्षांचे आहेत. अकरा मंत्री पदावर मित्र पक्ष समाधानी राहण्याची शक्यता नाही. बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पुरी ठाकूर यांचे पुत्र रामनाथ ठाकूर मंत्रिमंडळात आहेत. चरणसिंग यांचे नातू जयंत चौधरी यांचा मंत्रिमंडळात समावेश अपेक्षित होताच. झारखंडमध्ये पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुका लक्षात घेऊन तेथील तिघांचा मंत्रिमंडळात समावेश झाला आहे.

अपेक्षित धार्मिक ध्रुवीकरण न होता विरोधकांच्या जातीय समीकरणांचा फटका भाजपला बसला. त्या पार्श्वभूमीवर अन्य मागास, दलित, आदिवासी या घटकांना मंत्रिमंडळात सुमारे ६० टक्के स्थान देऊन भाजपने व्यूहरचना केली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीतील समीकरणे जुळविण्याला प्राधान्य आणि राज्यानुसार समतोल साधण्याचा प्रयत्न मंत्रिमंडळ रचनेत दिसतो.

# राष्ट्रात तरले, महाराष्ट्र हरले!

देशात चारशे पार व महाराष्ट्रात ४५ पारचा नारा देऊन निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या भाजपचे विमान मतदारांनी जमिनीवर आणले आहे. महाराष्ट्रात जोरदार मुसंडी मारत विरोधकांनी ३१ जागा मिळवल्या. तर महायुतीला केवळ १७ जागा मिळाल्या आहेत. देशातही भाजपला २४० म्हणजे म्हणजे मागच्यावेळी मिळाल्या त्यापेक्षा ६३ कमी जागा मिळाल्या. भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला २९३ जागांसह निसटते बहुमत मिळाले. दुसरीकडे विरोधकांच्या इंडिया आघाडीला २३६ जागा मिळाल्या आहेत. चारशे पार दूरच राहिले, रालोआला तीनशेचा टप्पाही ओलांडता आलेला नाही. नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दलाला(१२) व चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देसम (१६) यांना शेवटच्या क्षणी सोबत घेतले नसते तर मोदी सरकारला सत्तेच्या बाहेर जावे लागले असते. भाजपला जमिनीवर आणण्यासाठी उत्तरप्रदेश, महाराष्ट्र व राजस्तान ही तीन राज्ये कारणीभूत ठरली आहेत. या तिन्ही राज्यात सर्व एक्झिट पोल, राजकीय पंडितांनी व्यक्त केलेले अंदाज चुकीचे ठरवत आघाडीने मुसंडी मारली. उत्तरप्रदेशातील पराभव मोठा आहे; पण विधानसभा निवडणुका चार महिन्यांवर आलेल्या असताना महाराष्ट्रात झालेल्या पिछेहाटीमुळे महायुतीत खळबळ उडाली आहे. पराभूत सैन्यात यादवी अटळ असते. लोकसभेतील पिछेहाटीबद्दल एकमेकांकडे बोटे दाखवली जात आहेत. केंद्रातील मोदी सरकारचा शपथविधी झाल्यानंतर महाराष्ट्र मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होण्याची शक्यता आहे.

२०१९ च्या निवडणुकीत महायुतीला महाराष्ट्रात ४८ पैकी ४१ जागा मिळाल्या होत्या. यावेळची राजकीय स्थिती पाहता हा आकडा गाठणे शक्य होणार नाही हे उघड दिसत होते. तरीही युतीचे नेते जाहीरपणे ४५ व खाजगीत किमान ३६ जागा मिळतील असे दावे करत होते. प्रत्यक्षात त्याच्या अर्ध्याही जागा त्यांना मिळवता आल्या नाही. गेल्या दोन वर्षात महाराष्ट्रात जे फोडाफोडीचे राजकारण केले गेले त्याबद्दल लोकांमध्ये प्रचंड रोष होता. काही वाचाळ नेत्यांनी यावेळी चारशेपेक्षा जास्त जागा मिळवणार व घटनेत बदल करणार अशा वल्गना केल्या. हे वक्तव्य करणाऱ्या खासदाराला उमेदवारी नाकारून भाजपने सारवासारव करण्याचा प्रयत्न केला; पण तोवर बाण सुटला होता व अंतस्थ हेतू चव्हाट्यावर आला होता. गेल्या दहा वर्षांचे राजकारण व निवडणुकीत पुन्हा एकदा हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरणाचे प्रयत्न झाल्याने एकवटलेला मुस्लिम समाज, आरक्षणाबाबत सतत फसवणुकीमुळे दुरावलेला मराठा समाज, फसवणुकीची भावना असलेला ओबीसी समाज या सर्व बाबींमुळे मागच्या निवडणुकीत अडीच-तीन लाखांनी निवडून आलेल्या मतदारसंघात भाजपला दारुण पराभव पत्करावा लागला. केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, कपिल पाटील, भारती पवार पराभूत झाल्या. काँग्रेसने भाजपचा पराभव करून विदर्भाचा गड काबीज केला.लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांना १५२ विधानसभा मतदारसंघांत आघाडी मिळाली आहे, तर महायुतीला केवळ १२५ मतदारसंघांत आघाडी आहे. गेल्या काही निवडणुकांमध्ये भाजपला लोकसभा निवडणुकीत विधानसभेपेक्षा अधिक मते मिळतात हे दिसून आले आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत युतीला २२७ विधानसभा मतदारसंघांत आघाडी होती. लोकसभेनंतर दोन काँग्रेसमधून जवळपास दोन डझन आमदार युतीच्या मेगाभरतीत सामील झाले होते; परंतु विधानसभा निवडणुकीत प्रत्यक्षात केवळ १६० जागा मिळाल्या. यावेळी लोकसभेतच युतीचा परफॉर्मन्स एवढा खाली आला असेल, तर विधानसभेत काय होईल या भीतीने महायुतीच्या अनेक आमदारांचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे अनेकांना परतीचे वेध लागले आहेत. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटातील आमदारांची चुळबुळ वाढली आहे. येणाऱ्या काही दिवसात काही मोठ्या घडामोडी घडल्या तर फार आश्चर्य वाटायला नको.

ठाकरेंना कमी जागा-या निवडणुकीत आघाडी जास्त जागा जिंकणार, की महायुती याबद्दल वेगवेगळी मते होती; पण काँग्रेस आघाडीतील सर्वात लहान पक्ष ठरेल असा अंदाज मात्र अनेकजण व्यक्त करत होते; पण हे सर्व अंदाज चुकीचे ठरवत काँग्रेसने जोरदार मुसंडी मारली. जागावाटपात दुय्यम स्थान मिळूनही काँग्रेसने आपल्याला मिळालेल्या १७ पैकी १३ जागा काबीज केल्या. सांगलीतून बंडखोर विशाल पाटील निवडून आले. भिवंडी, वर्धा, दक्षिण मध्य मुंबई, सांगली या काँग्रेसचे प्राबल्य असलेल्या जागा त्यांच्याकडून हिरावून घेतल्या नसत्या तर काँग्रेसचे संख्याबळ महायुतीतील तीन पक्षांपेक्षाही अधिक झाले असते. १७ पैकी १५ जागांवर काँग्रेसची भाजपशी लढत होती. त्यापैकी ११ जागा काँग्रेसने जिंकल्या आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने केवळ दहाच जागा घेतल्या व यातील ८ जागा निवडून आणल्या आहेत. त्या तुलनेत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला मात्र तुलनेत कमी जागा मिळाल्या. उद्धव ठाकरेंनी २१ जागा लढवल्या व त्यांचे ९ खासदार निवडून आले. त्यांची व एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची १३ ठिकाणी थेट लढत होती. यातील सात जागा शिंदे गटाने, तर सहा जागा ठाकरे गटाने जिंकल्या. ठाणे, कल्याण, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, रायगड या कोकणातील जागा त्यांना जिंकता आल्या नाही. त्यामुळे मुंबईतील मराठी माणसांनी शिवसेनेला मते दिली नाहीत, त्यांच्या जागा अल्पसंख्याक मतांमुळे निवडून आल्याचा दावा भाजप व शिंदे गट करत आहे. कारण काहीही असले तरी हिंदुत्वाच्या राजकारणाला सोडचिठ्ठी देऊन धर्मनिरपेक्ष राजकारणाची कास धरलेल्या उद्धव ठाकरेंवर धर्मनिरपेक्ष मतदारांनीही विश्वास दर्शवला हे सुद्धा खूप महत्वाचे आहे.

आंबेडकरांना धक्का- या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार व वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांना मोठे धक्के बसले आहेत. अजित पवार यांना महायुतीत अवघ्या पाच जागा मिळाल्या होत्या. त्यातील एक जागा त्यांना महादेव जानकरांसाठी सोडावी लागली. धाराशिवला भाजपचा, तर शिरूरमध्ये शिंदे सेनेचा उमेदवार घ्यावा लागला. त्यामुळे त्यांना केवळ दोनच जागा मनाप्रमाणे लढवता आल्या व त्यातील सुनील तटकरे निवडून आले. हे पन्नास टक्के यश आहे असे म्हटले तरी, बारामतीत त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा झालेला पराभव जिव्हारी लागणारा आहे. २०१९ च्या निवडणुकीत मुलगा पार्थ पराभूत झाला होता. दोन्ही वेळा अकारण प्रतिष्ठा पणाला लावून त्यांनी स्वतःची अडचण करून घेतली. लोकसभा निवडणुकीनंतर सोबत आलेल्या आमदारांमध्ये चुळबुळ वाढली आहे. त्यामुळे अजित पवार पुढे काय करणार असा प्रश्न अनेकांना पडला आहे. प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीत यावे यासाठी बरेच प्रयत्न झाले. पण त्याला यश आले नाही. मागच्या निवडणुकीत वंचित व एमआयएमच्या आघाडीचा मोठा फटका दोन काँग्रेसला बसला होता. यावेळी तसे होऊ नये यासाठी त्यांची धडपड होती. आंबेडकरांनी राज्यात ३७ उमेदवार उभे केले; पण त्याचा फारसा परिणाम झाला नाही, कारण मतदारांनीच यावेळी मतविभागणी होऊ दिली नाही. २०१९ च्या निवडणुकीत वंचितला ६.९८ टक्के मते होती. ती यावेळी ३.६७ टक्के झाली. केवळ दोन उमेदवारांना एक लाखापेक्षा अधिक मते मिळाली. मुंबईच्या सहा मतदारसंघांत वंचितला अवघी ६० हजार ५२८ मते मिळाली. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत वंचित काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष असेल.


फडणवीसांना मोकळे करतील?

महाराष्ट्रातील पराभवाची जबाबदारी स्वीकारून देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री पदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याची विनंती पक्ष नेतृत्वाला केली आहे. आपण ही इच्छा निराशेतून व्यक्त केलेली नाही, तर त्यामागे एक रणनीती आहे. मला पक्षाचे काम करायचे आहे. मी पळणारा नाही तर लढणारा माणूस आहे, असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील जागावाटप, उमेदवारांची निवड आदी बाबतीत निर्णय घेण्याची पूर्ण मुभा नेतृत्वाने त्यांना दिली होती. त्यांच्या आग्रहामुळे मित्रपक्षांनाही आपले उमेदवार बदलावे लागले. जागावाटपाच्या विलंबामुळे अनेक ठिकाणी शेवटच्या क्षणी उमेदवार जाहीर झाले. आधीच राजकीय वातावरण प्रतिकूल असताना या सर्व बाबींचा मोठा फटका युतीला बसला. त्यावरून कोणी तक्रार करण्याआधीच फडणवीसांनी राजीनाम्याचे अस्त्र बाहेर काढले. निवडणुकीला चार महिने उरलेले असताना त्यांना मोकळे करायचे की नाही? मोकळे केले तर मंत्रिमंडळातील भाजपचा चेहरा कोणाला करायचे? विनोद तावडे यांना महाराष्ट्रात परत पाठवले जाणार का? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाले आहेत. महाराष्ट्रातील पराभवाची भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने गंभीर दखल घेतल्याचे दिसते. त्यामुळे प्रदेश भाजपत मोठे फेरबदल होतील असे दिसते.

## वास्तव्याची जाण

एका राज्याचा राजा दररोज सकाळी फेरफटका मारण्यासाठी जात होता. त्याला रस्त्यात जी व्यक्ती पहिल्यांदा दिसेल त्याची तो प्रत्येक इच्छा पूर्ण करायचा. असेच एका दिवशी निघाला असता त्याला एक ब्राह्मण भेटला. राजाने त्याला विचारले की, ब्राह्मण देवता मी आपली काय मदत करु. ब्राह्मण लाजून म्हणाला, महाराज आपण जे उचित समजाल त्यावर राजा म्हणाला, आपण सांगा काय पाहिजे. ब्राह्मणाच्या मनात लोभ आला. तो राजला म्हणाला, महाराज आपण फिरून या तोपर्यंत मी विचार करतो की, मला काय पाहिजे. ब्राह्मणाचे म्हणणे ऐकून राजा फिरण्यासाठी गेला. नंतर ब्राह्मणाच्या मनात विचार आला की, अशी संधी पुन्हा-पुन्हा मिळत नाही. एकदाच असे काही तरी मागतो की, पुन्हा कधी काही मागण्याची गरज पडणार नाही. राजा फिरून आला व त्याने ब्राह्मणाला त्याची इच्छा विचारली. तेव्हा ब्राह्मणने राजाला पूर्ण राज्य मागीतले. राजानेही ताबडतोब यासाठी होकार दिला व ब्राह्मणाला म्हणाला, मी तर अनेक दिवसांपासून याची प्रतिक्षा करत होतो की या ओझ्यातून केव्हा मुक्त होईल. आपण येथेच थांबा मी राज्याचा कारभार आपल्याकडे सोपवण्याची व्यवस्था करतो. असे म्हणून राजा महालात जातो. राजाचे म्हणणे ऐकून ब्राह्मण चिंतेत पडतो. त्याला वाटत नव्हते की, राजा एवढ्या सोप्या पद्धतीने राज्य सोपवून देईल. ब्राह्मणाच्या मनात ईश्वरीय भावना जागृत झाली आणि त्याने विचार केला की, वास्तविकतेमध्ये वैरागी तर राजा आहे. मी तर फक्त ढोंग करतो. हा तर मोहापासून दूर आहे. ब्राह्मणाला वास्तव्याची जाण झाली आणि तो तिथून निघून गेला. त्याला आपल्या मोहावर पश्चाताप झाला.

## राशी भविष्य



१३ जून २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व
बौद्धिक चळवळीचे नेतृत्व आपण कराल. त्यातून आपली प्रतिमा उंचावेल. नशिबाची साथ असल्याची जाणीव पदोपदी होईल.

वृषभ : शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम
जुन्या आठवणी, नव्या मित्रांची संगत यातून भरीव कामगिरी करू शकाल. सासू-सुनांतील दुरावा कमी करा.

मिथुन : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
घरात कुटुंबियांच्या तब्येती व काही विचित्र प्रश्न यातून सफाईने मार्ग काढावा लागेल.

कर्क : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर
आयुष्याला वळण देणारे ठरावेत असे प्रस्ताव आपले उत्पन्नही वाढविणारे ठरतील. वृद्धांच्या तब्येती सांभाळा.

सिंह : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
कोणत्याही वादविवादात मध्यस्थी करू नका. शब्दप्रयोग व पैसा यांचा वापर विचारपूर्वक करा.

कन्या : शुभ रंग: केसरी, शुभ दिशा : उत्तर
घरात काही मंगलकार्ये ठरतील. कार्यक्रमानिमित्त घरात पाहुण्यांची वर्दळ राहील.

तुळ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
मैत्रिणीसह होणाऱ्या गप्पातून ज्ञानात भर पडेल. काही वैचारिक चर्चा हितकारक ठरतील.

वृश्चिक : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम
तब्येतीची प्रसन्न साथ, घरातले मंगल वातावरण, नशीबाची अनुकूल साथ हे सर्व कसे चांगले जमून येणार आहे.

धनु : शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पूर्व
अनाठायी खर्च टाळा. खर्च करताना आपण काही अनिष्ट गोष्टींना खतपाणी घालत नाही ना याची काळजी घ्या.

मकर : शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व
घरगुती आजारपण, नाराज शेजारी, पाहुण्यांचे मुक्काम आणि स्वतःची कामाची घाई यातून वेळ काढावा लागेल.

कुंभ : शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : उत्तर
प्रवासातून चांगले अनुभव आपल्या व्यवसायात बदल करायला लावतील. संततीशी वादाचे प्रसंग येतील.

मीन: शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : उत्तर
नोकरीच्या अपेक्षा असणाऱ्यांना अपेक्षित अशी नोकरी मिळेल. नोकरदारांना नोकरीतील बदल लाभदायक ठरतील.

१३ जूनला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सूर्य, गुरू, हर्षल व बुधाचा प्रभाव आहे. तुमची बुध्दी तल्लख आहे. एखादी गोष्ट बुध्दीला पटल्याखेरीज तुम्ही तिचा स्वीकार करीत नाही. तुमचे विचार क्रांतिकारक असतात. सतत भविष्यात वेध घेण्यात गर्क असल्याने जगाच्या तुम्ही एक पाऊल पुढेच असता. तुमच्या निर्णयात कधीही बदल करण्याची तुम्हाला सवय आहे. नीतिमूल्यांचा तुम्ही अनादर करीत नसला तरी काही परंपरा, रूढी यांच्या चौकटीत आपला कोंडमारा होतो असे तुम्हाला वाटते. तुम्ही व्यक्तिस्वातंत्र्याला महत्व देता.

सतत आपले निर्णय बदलत राहिले तर लोकातली तुमची विश्वासार्हता कमी होईल. आपली मते लोकांना पटवून देतांना त्यांच्या बुध्दीबरोबर भावनेलाही आवाहन करा. जीवनात चढउतार झाल्याने नैराश्यामुळे मानसिक विकार होतील. मनाचा समतोल टिकवण्यासाठी ध्यानधारणा करा.

कार्यक्षेत्र : आतापर्यंत विज्ञानाने लावलेल्या शोधामध्ये अधिक भर टाकण्याची इच्छा व तुमचा प्रयत्न असल्याने संशोधन क्षेत्र तुम्हाला जास्त अनुकूल ठरेल. भौतिकी, खगोलभौतिकी, जीवनशास्त्र, जैविक, तंत्रज्ञान या प्रांतात मूलभूत संशोधन करता येईल. ऊर्जेचे नवे स्रोत किंवा इतर इंधनांच्या निर्मितीत सुधारणा यात लक्ष्य घालता येईल. अंतराळविज्ञान, संगणक प्रणालींचा विकास ही क्षेत्रेही अनुकूल आहेत.

प्रणयी जीवन : तुमचे निर्णय सतत बदलत असल्याने एकाच व्यक्तीच्या आकर्षणात तुम्ही जास्त काळ गुंतून राहू शकत नाही. त्यामुळे लोक तुमच्याकडे साशंकतेच्या नजरेने पाहतात. जुन्या रूढी परंपरांचा तुम्हाला जाच वाटत असल्याने डिसेंबर २१ ते जानेवारी १९ दरम्यान जन्मलेल्या व्यक्ती टाळा. जुलै २१ ते ऑगस्ट २१ मधील व्यक्ती अनुरूप ठरतील.

वर्षफळ : संततीबाबत काही ना काही समस्या उत्पन्न होईल. ज्योतिष, मंत्रतंत्र वगैरे गूढ विद्यात रस वाटेल. फेब्रुवारी मार्च मध्ये कौटुंबिक खर्च प्रमाणाबाहेर वाढतील. एप्रिल मे मध्ये अस्थिरतेच्या समस्यांना तोंड द्यावे लागेल. जुलै ऑगस्ट मध्ये मनोव्यथा समजून घेणारे माणूस भेटेल. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये उत्कर्षाच्या योजना कार्यान्वित करू शकाल. नोव्हेंबर डिसेंबर मध्ये सरकार दरबारी प्रतिष्ठा उंचावेल.

महत्वाचे वर्ष : ४, १३, २२, ३१, ४०, ४९, ५८, ६७.

भाग्यरत्न : गोमेद

याच तारेखेची व्यक्ती : बाबाराव सावरकर, ज्युईली देऊसकर

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# वैयक्तिक अर्थसंकल्प - काळाची गरज

अनेक जणांचे आर्थिक आराखडे आणि गुंतवणूक बघितल्यावर एक गोष्ट मात्र मी नक्की सांगू शकते की, ज्या कुटुंबांनी किंवा गुंतवणूकदारांनी अर्थसंकल्प ठरवून मग खर्च आणि शिस्तबद्ध गुंतवणूक केलेली आहे, त्यांची आर्थिक परिस्थिती आज इतरांपेक्षा चांगली आहे.

मार्ग सुबत्तेचा : वैयक्तिक अर्थसंकल्प - काळाची गरज (शिशि–शिपींरींळेपरश्र ळारसश/षळपरपलळरश्र शुर्शिी)

माझ्याकडे येणाऱ्या अनेक पालकांची त्यांच्या पाल्यांबद्दल एक तक्रार नेहमीच असते, ती म्हणजे आमची मुलं भरपूर कमावतात पण पैसे वाया घालवतात. गरज नसताना खर्च करतात, ते भविष्याचा विचार करत नाहीत. आम्ही जेवढं सांगतो तेवढंच काय ते बाजूला ठेवतात आणि बाकी पैशांचं काय करतात देव जाणे. एका आईने तर सरळ सांगितलं की, माझ्या मुलाला त्याच्या पगाराएवढी गुंतवणूक करायला लावा. त्याला खर्चाला मी पैसे देत जाईन आणि मजा म्हणजे हे काही विशीतील मुलांबद्दलच नाही तर अगदी ४०-५० च्या जोडप्यांच्या बाबतीतसुद्धा त्यांचे पालक सांगतात. प्रत्येक आदल्या पिढीला पुढच्या पिढीबद्दल हेच वाटतं. परंतु एक गोष्ट इथे नक्कीच दखल घेण्याजोगी आहे की, आताच्या पिढीच्या हातात पैसे जास्त आहेत आणि आधीच्या पिढीपेक्षा जबाबदाऱ्या कमी. शिवाय समाजमाध्यमाच्या (सोशल मीडिया) प्रभुत्वाखाली जगणाऱ्या आजच्या पिढीला धजडज – र्धी जपश्रू डळींश जपलश' हेच बोधवाक्य ठाऊक असल्याने खर्चावर बंधन घालून गुंतवणूक करणं काहीसं जड जातं. आता ही गोष्टसुद्धा तितकीच खरी आहे की, परिस्थितीतून गेल्यावर एखादा त्याबाबत जागरूक होतो. मात्र ज्याने विपरीत परिस्थिती काय असते हे पाहिलंच नसेल. त्याला भीतीचा बागुलबुवा किती दिवस दाखवणार! असो परंतु माझ्या आजवरच्या कारकीर्दीत अनेक जणांचे आर्थिक आराखडे आणि गुंतवणूक बघितल्यावर एक गोष्ट मात्र मी नक्की सांगू शकते की, ज्या कुटुंबांनी किंवा गुंतवणूकदारांनी अर्थसंकल्प ठरवून मग खर्च आणि शिस्तबद्ध गुंतवणूक केलेली आहे, त्यांची आर्थिक परिस्थिती आज इतरांपेक्षा चांगली आहे.

मुळात आर्थिक परिस्थिती चांगली ठेवायला फक्त कमाई चांगली असून पुरत नाही. कारण कमाई वाढली आणि खर्चसुद्धा तसेच वाढले तर निव्वळ बचत तेवढीच राहते. काही बाबतीत खरंच जबाबदाऱ्या जास्त असल्याने खर्च वाढतात. उदाहरण म्हणजे घरात असलेली लहान मुलं, कुटुंबात कमावणारा एक आणि खाणारे भरपूर, आजारी कुटुंबीय, इतरांचं आर्थिक अवलंबत्व, इत्यादी. अशा वेळी मिळकत वाढवण्यापलीकडे फारसा काही पर्याय उपलब्ध नसतो. परंतु आपल्या आजूबाजूला असे अनेक जण दिसतील की, जे स्वतःच्या मनाप्रमाणे, हवे तितके, हवे तसे पैसे खर्च करतात. परंतु पुढची परिस्थिती किती गंभीर असू शकते ही जाणीव वेळीच झाली तर योग्य ती मौजमजा करून आपण पुढचं आयुष्यसुद्धा आर्थिकदृष्ट्या सुदृढ करू शकतो.मुळात सुरुवात करताना ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे की, आपल्या देशात सगळ्यासाठी कर्ज मिळतं, परंतु निवृत्तीसाठी नाही. तेव्हा आपले पैसे खर्च करायच्या आधी स्वतःच्या निवृत्ती नियोजनाची तयारी आधी करावी. आपलं वैयक्तिक आर्थिक समीकरण बांधून, त्यानुसार काटेकोरपणे गुंतवणूक आणि खर्च दोन्ही केल्याने आपला फायदा नक्कीच होऊ शकतो. पहिला पगार मिळाला की, सर्वात पहिलं काम आपण काय करतो? पार्टी. खर्च, मौज मज्जा. अनेक वर्षे आई वडिलांवर अवलंबून राहिल्यानंतर (खर्चाच्या बाबतीत भरपूर टोमणे ऐकल्यानंतर!) हे असं वाटणं स्वाभाविकच असतं. परंतु याला वेळीच नियोजनाखाली आणलं तर फायदा आपलाच. इथे मला एका मुलीची गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते. तिला फिरायला फार आवडतं. त्यामुळे तिचा पगार आणि खासकरून बोनस झाला की, ती ठरवायची या वर्षी कुठे फिरायला जायचंय आणि मग त्यानुसार सगळी योजना आखून मस्त मजा करत तिचं आयुष्य चाललं होतं. घरची परिस्थिती चांगली असल्याने तिच्या पैशांवर कोणी अवलंबून नव्हतं. परंतु जेव्हा लग्नाचा विषय निघाला तेव्हा तिच्या लक्षात आलं की, तिने स्वतःहून काहीच सोय केली नव्हती आणि म्हणून खर्चाचा सर्व भार तिच्या वडिलांवर पडणार होता. वडिलांची तयारी व्यवस्थित होती, परंतु त्या मुलीला ते काही योग्य वाटत नव्हतं. शेवटी लग्न झाल्यानंतर तिने वडिलांचे पैसे हळूहळू परत दिले.मासिक मिळकत आणि साजेसे राहणीमानाचे खर्च हे समीकरण लवकर बसवलं की गुंतवणूक चांगल्या पद्धतीने सुरू करता येते. वैयक्तिक अर्थसंकल्प म्हणजे वार्षिक मिळकत, गुंतवणूक आणि खर्चांचा ताळमेळ. आपण आर्थिक वर्षानुसार हे करू शकतो.



गरजा आणि मौज मजेची मर्यादा ठरवली की, मग गुंतवणूक कधी, किती आणि कशामध्ये हे ठरवावं. एक ढोबळ अंदाज घेतला तर मासिक २५,००० मिळकत असणाऱ्या व्यक्तीचे जर गरजेचे खर्च १५,००० रुपयांचे असतील, तर ५,००० बँकेत रिकरिंग मुदत ठेवीमध्ये गोळा करावे आणि बाकी ५,००० म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीत. मोठ्या जबाबदाऱ्या (लग्न, मुलं) सुरू व्हायच्या आधी गुंतवणूक क्षमता जास्त असते.

तेव्हा या काळामध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक करावी. जर घर घ्यायचं असेल, तर २५ टक्के पैसे कसे जमा होणार हे ठरवावं. मुंबईसारख्या शहरामध्ये किमान २५-३० लाख रुपये असल्याशिवाय घर घेणं पण शक्य होत नाही. तेव्हा आधी ५-६ वर्षे तरी चांगल्या प्रकारे गुंतवणूक करून मग घरासाठी कर्ज घ्यावं. काही पालक मुलांना जबरदस्ती घर घ्यायला लावतात की, त्या निमित्ताने तरी मुलं पैसे वाचवतील. परंतु एक लक्षात घ्या की, घरामध्ये केलेली गुंतवणूक ही खूप मोठ्या रकमेची असून, पुढे त्यातून नक्की किती फायदा होणार हे नीट पाहावं. त्याऐवजी निरनिराळ्या गुंतवणूक पर्यायांची सांगड करून आणि रोकड सुलभता सांभाळून एक चांगला पोर्टफोलिओ बनवला तर पुढे त्या मुला/मुलीला त्याचा जास्त फायदा होईल.

क्रेडिट कार्ड आणि ऑनलाइन खरेदी हे दोन राक्षस आपले पैसे कसे संपवतात कळतच नाही. सेलफ, डिस्काउंटफ, फ्रीफ या शब्दांचं जाळं प्रत्येक सर्वसामान्य व्यक्तीला अडकवण्यासाठी बनवलेलं असतं. आपल्याला एखाद्या गोष्टीची खरी गरज आहे की नाही हे न तपासता फक्त ती गोष्ट स्वस्त मिळतेय म्हणून घेण्यात कोणती हुशारी आहे? इथे खरा विचार करावा तो आपल्या खिशातून उगीच वेळेआधी पैसे जाण्याचा. परंतु आपण विचार करतो की, अरे माझा खर्च इतक्या पैशांनी कमी होतोय तर मग त्याने एक प्रकारे बचत झाली ना, मग इथे काय प्रॉब्लेम आहे? आपल्या नियोजित खर्चांच्या पलीकडे असणारी रक्कम ही आपल्या गुंतवणुकीला पोषक असते. असे खर्च जेव्हा आपण वेळेआधी करतो, तेव्हा गुंतवणुकीची रक्कम कमी होते आणि त्या गुंतवणुकीला मग वाढायला वेळ कमी मिळतो.

## जर तुम्ही विसरायला लागलात गोष्टी, तर तुम्ही या मानसिक आजाराचे झाले आहात शिकार, अशा प्रकारे तुम्ही करू शकता स्वत:चे संरक्षण

तुम्हालाही गोष्टी विसरण्याची समस्या भेडसावत असाल आणि ही समस्या खूप दिवसांपासून कायम आहे, तर आताच लक्ष द्या. हे अल्झायमर रोगाचे लक्षण आहे. जगभरात ३५.६ दशलक्षाहून अधिक लोक अल्झायमर रोगाने ग्रस्त आहेत. या आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी २१ सप्टेंबर रोजी जागतिक अल्झायमर दिन साजरा करण्यात येतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार २०३० पर्यंत अल्झायमरच्या रुग्णांची संख्या दुप्पट होऊ शकते. या आजारामुळे व्यक्ती गोष्टी विसरायला लागते. पूर्वी ही समस्या वयाच्या ५० नंतर होत होती, पण आता ३० ते ४० वयातच लोक याला बळी पडत आहेत. अल्झायमरमुळे स्मरणशक्ती आणि विचारांशी संबंधित समस्या उद्भवतात. सुरुवातीला या आजाराची लक्षणे सहज लक्षात येत नाहीत, पण जसजसा हा आजार वाढत जातो, तसतसे मेंदूला हानी पोहोचू लागते. काही प्रकरणांमध्ये, व्यक्तीची स्मरणशक्ती खूपच कमकुवत होते. या आजारावर आजपर्यंत कोणताही इलाज नाही.बऱ्याच प्रकरणांमध्ये, रुग्णांना या रोगाचे निदान होत नाही. स्मरणशक्तीची समस्या



असली, तरी लोक वाढत्या वयाची समस्या समजतात आणि डॉक्टरांकडून तपासणी करून घेत नाहीत. अशा परिस्थितीत हा आजार शरीरात फोफावतो आणि नंतर तो गंभीर होतो. वाढत्या वयानुसार, हा आजार धोकादायक बनतो आणि काही प्रकरणांमध्ये व्यक्ती सर्वकाही विसरण्यास सुरवात करते. अशा परिस्थितीत तो त्याच्या आयुष्यातील प्रत्येक कामासाठी दुसऱ्या व्यक्तीवर अवलंबून असतो.याबाबत न्यूरोसर्जन सांगतात की अल्झायमर रोग मेंदूच्या पेशींभोवती प्रथिनांच्या असामान्य निर्मितीमुळे होतो. अमायलोइड प्रथिनांच्या कार्यात अडथळा निर्माण झाल्यामुळे, मेंदूच्या पेशींभोवती प्लेक्स तयार होतात. प्रथिने अशा प्रकारे कार्य करण्याचे कोणतेही स्पष्ट कारण नाही, परंतु जर एखाद्या व्यक्तीच्या मेंदूमध्ये हे सर्व घडले, तर त्याला अल्झायमर रोग होतो. सर्जन सांगतात की लोकांना अल्झायमरबद्दल माहिती नाही. लोक याला मानसिक आजार किंवा वेडेपणा मानतात, परंतु तसे नाही. या कारणास्तव हा रोग सुरुवातीला ओळखला जात नाही. अशा स्थितीत लोकांना अल्झायमरच्या लक्षणांची माहिती असणे गरजेचे आहे.

या लक्षणांची घ्या काळजी

अनेकदा गोष्टी विसरणे

बोलण्यात अडचण

चालणे किंवा संतुलन राखण्यात अडचण

लोकांपासून दूर रहाणे

कोणत्याही कामात रस नसणे

एकदा अल्झायमरचा आजार झाला की त्यावर इलाज नसतो, मात्र दैनंदिन जीवनात काही खबरदारी घेतल्यास या आजाराचा धोका कमी करता येतो, असे सर्जन सांगतात. त्यासाठी पुरेशी झोप घेणे, मानसिक ताणतणाव न घेणे, आहाराची काळजी घेणे आणि दररोज व्यायाम करणे महत्त्वाचे आहे.

### उपदेशकथा:ऐट

एका गृहस्थाच्या घरी एक दिवस एक खास मित्राला मेजवानी होती. त्याचा एक कुत्रा होता. त्यानेही आपल्या एका दोस्त कुत्र्याला त्याच दिवशी आपल्याकडे जेवणाचे आमंत्रण दिले. तो कुत्रा जेव्हा आला तेव्हा तयार होत असलेले चमचमीत जेवणाचे पदार्थ पाहतच राहिला. त्याला आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या तो म्हणाला, काय मस्त मेजवानी मिळणार आज. अगदी पोट फुटेपर्यंत मी आज खाणार आहे. मग पुन्हा परवा सकाळपर्यंत पुन्हा खायला नको. आपल्या मित्रांवरच प्रेम दाखविण्याकरता तो आपली शेपटी हालवत राहिला. पण त्या शेपटीच्या वळवळ्यामुळे तिथल्या स्वयंपाक्याचे लक्ष त्याच्याकडे गेले आणि त्याने ताबडतोब त्याचे पाय धरून त्याला घराबाहेर फेकून दिले. अर्थात रागाने आणि निराशेने भूकंत भूकंत तो आपल्या घरी निघाला. वाटेत त्याला त्याचा दुसरा मित्र भेटला. त्याने विचारले, काय कसं काय होत जेवण? काही विचारू नको, तो म्हणाला, अरे, तेथे इतकी दारू होती की, मी तिच्यावर ताव मारला. त्या घरातून मी कसा बाहेर पडलो ते देखील मला समजत नाही.कथा उपदेश : दुसऱ्याच्या जीवावर जे जे आपल्याला चांगल्या गोष्टी देण्याचा आव आणतात त्यांच्यावर विश्वासून चालणे बरे नाही.

## तुमच्याही अंतर्वस्त्रचा मागचा पट्टा आपोआप सरकतो? जाणून घ्या कारणे आणि उपाय

कोणताही सण असो वा कुठलाही प्रसंग, महिला त्यांच्या फॅशनची, स्वत:ची वेशभूषा कशी करायची याची पूर्ण काळजी घेतात. काय मॅचिंग घालायचे. यासोबतच ती तिच्या फिगरचीही खूप काळजी घेते, म्हणूनच तिची अंतर्वस्त्र मधील निवड खूप वेगळी आहे. अंतर्वस्त्र नियमितपणे घातल्यास आपल्याला अनेक फायदे होतात. अंतर्वस्त्र घालणे जितके आवश्यक वाटते तितकेच अस्वस्थ असू शकते. अंतर्वस्त्रशी संबंधित अनेक समस्या आहेत ज्या आपल्याला अनेकदा त्रास देतात. उदाहरणार्थ, अंतर्वस्त्रचा पट्टा वारंवार सरकणे. आता जर अंतर्वस्त्रची फिटिंग बरोबर नसेल, तर ती नुसतीच अस्वस्थ वाटत नाही तर ती तुमच्यासाठी योग्य नाही. जर तुम्ही दिवसभर अयोग्य अंतर्वस्त्र घालत असाल तर त्याचा तुमच्या पाठीवर परिणाम होईल. अंतर्वस्त्र सोबत येणारी पहिली समस्या म्हणजे मागचा पट्टा आपोआप वर सरकू लागतो. पण असे का होते आणि त्याचे तोटे काय आहेत हे देखील आम्ही तुम्हाला सांगतो. अंतर्वस्त्रचा मागचा पट्टा आपोआप का सरकतो? जाणून घ्या कारणे



१. तुमच्या अंतर्वस्त्रची गुणवत्ता खराब आहे आणि मागच्या पट्ट्याचा लवचिक भाग सैल झाला आहे.

२. तुम्ही तुमची अंतर्वस्त्र वारंवार हाय स्पीड मशिनवर धुत असल्यामुळे तिचे अलाइनमेंट बिघडले आहे.

३. तुमची अंतर्वस्त्र अंडरवायर आहे आणि तिचे वायरिंग खराब झाले आहे.

४. तुमच्या पाठीची चरबी वाढली आहे आणि तुम्ही अजूनही जुनी अंतर्वस्त्र घातली आहे.

५. अंतर्वस्त्र खूप घट्ट आहे किंवा खूप सैल आहे, दोन्ही वाईट आहेत आणि म्हणूनच तुम्ही तुमच्या अंतर्वस्त्रची सेटिंग निश्चित करणे महत्त्वाचे आहे.

ब्राच्या पट्ट्या वर सरकण्यापासून कसे थांबवायचे?

१. सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या अंतर्वस्त्रचे फिटिंग दुरुस्त करावे लागेल. जर ते योग्य नसेल तर तुम्हाला नक्कीच अस्वस्थ वाटेल.

२. तुमच्या अंतर्वस्त्रच्या बाजूच्या पट्ट्या तुम्ही खूप घट्ट केल्या आहेत का ते तपासा. जर तुम्ही केले असेल तर ते दुरुस्त करा.

३. बाजूचा पट्टा सैल असल्यास, तो खूप सैल किंवा खूप घट्ट आहे का ते पाहण्यासाठी तुमचा मागचा पट्टा तपासा.


४. समस्या अजूनही कायम राहिल्यास, तुम्हाला अंतर्वस्त्र बदलण्याची आवश्यकता आहे कारण कदाचित तुमच्या अंतर्वस्त्रचे सरेखन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

आपण या समस्येचे निराकरण न केल्यास काय?

१. अयोग्य अंतर्वस्त्र फिटिंगमुळे तुमचा पाठीचा पोस्चर खराब होऊ शकतो.

२. तुम्हाला पाठदुखी किंवा बरगडी दुखण्याची समस्या देखील असू शकते.

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# कुवेतमध्ये ६ मजली इमारतीला भीषण आग, ४१ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली : कुवेतच्या मंगाफ येथे आज सकाळी एका उंच इमारतीला भीषण आग लागल्याची घटना घडली. या भीषण दुर्घटनेत ४३ जणांचा मृत्यू झाला असून ३० जण जखमी असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे मृतांमध्ये ४१ भारतीय नागरिक असल्याचे समजते. कुवेतमधील भारतीय दुतावासाने याबाबत माहिती देताना म्हटले की, या दुर्घटनेत ३० पेक्षा जास्त कामगार जखमी झाले आहेत. येथील मंगाफ शहरात सकाळी सहाच्या सुमारास ही आग लागल्याची घटना घडली. ज्या इमारतीला आग लागली ती इमारत कामगारांच्या निवासासाठी वापरण्यात येत होती, जेथे मोठ्या संख्येने कामगार राहत होते.

कुवेतच्या दक्षिण अहमदी प्रांतातील मंगाफ भागातील ६ मजले उंच इमारतीत ही आग लागली होती. या इमारतीमधील स्वयंपाकघरातून आगीने पेट घेतला, त्यानंतर ही आग सर्वत्र भडकली. या इमारतीमध्ये १६० जण राहत होते. हे सर्वजण एका कंपनीत काम करत होते. त्यांच्या निवासाची सोय या इमारतीमध्ये करण्यात आली होती. दुर्दैवाने आज सकाळी लागलेल्या भीषण आगीत ४१ जणांचा मृत्यू झाला असून ३० जण जखमी आहेत.

भारतीय दूतावासानेही ट्वीट करून दिली माहिती कुवेतमधील भारतीय दूतावासानेही ट्वीटरवरून पोस्ट लिहिली आहे. भारतीय कामगारांशी संबंधित आगीच्या दुःखद घटनेनंतर तात्काळ मदतसेवेसाठी हेल्पलाईन नंबर ९६५६५५०५२४६ जारी करण्यात आला आहे. सर्वच भारतीयांनी अपडेट माहितीसाठी या नंबरशी संपर्कात राहावे, सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आवाहनही दूतावासाकडून करण्यात आले आहे.

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याकडून शोक कुवेत शहरात लागलेल्या या आगीच्या घटनेवर परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनीही ट्वीट करून शोक व्यक्त केला. आगीच्या घटनेने दुःख झाले आहे, या दुर्घटनेत ४१ पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाला असून ५० पेक्षा जास्त जखमी असल्याची माहिती आहे. जखमींना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. याशिवाय आपले राजदूत रुग्णालयात पोहोचले आहेत. पीडित कुटुंबीयांप्रती माझ्या सहवेदना आहेत, तर जखमींना लवकरात लवकर बरे करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असेही जयशंकर यांनी म्हटले.

## महाविकास आघाडीत बिघाडी

पुणे : प्रतिनिधी- महाविकास आघाडीत महाबिघाडी होण्याची चिन्हे आहेत. पुण्यात महाविकास आघाडीत मंचरमध्ये बिघाडी झाल्याचे पाहायला मिळाले. शरद पवार पक्षाचे नवनिर्वाचित खासदार अमोल कोल्हे यांच्या नागरी सत्कार कार्यक्रमात ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी राडा घातला.

अमोल कोल्हेंनी देवदत्त निकम यांचा भावी आमदार म्हणून उल्लेख करताच सभेतून शिवसेना कार्यकर्त्यांनी काढता पाय घेतला. त्यानंतर कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी शिवसैनिक आणि अमोल कोल्हे यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. केंद्रात अजित पवार गटाला एकही मंत्रिपद न मिळाल्यानंतर खासदार अमोल कोल्हेंनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. शरद पवारांचा हात डोक्यावर असताना मिळणारी वागणूक आणि हात नसताना मिळणारी दिल्लीतली वागणूक ही लक्षात घ्या, अशी टीका करत कोल्हेंनी अजित पवारांना डिवचले.



युगांडाची राजधानी कंपाला येथे फिफा विश्वचषक गट जी सामन्यापूर्वी फोटोसाठी पोझ देताना युगांडाचे खेळाडू.

# उदगीरात बस्वराज पैके यांना स्व. हलकीकर स्मृती पुरस्कार प्रदान



**उदगीर (प्रतिनिधी)** चाळीस वर्षांपूर्वी निलंगा सारख्या ग्रामीण भागात पत्रकारिता करत असताना ज्येष्ठ पत्रकार स्व. लक्ष्मीकांत हलकीकर यांनी कधीही तत्त्वाशी तडजोड केली नाही. मूल्य निष्ठा सांभाळून पत्रकारिता करीत असताना त्यांनी सामान्य माणसाला न्याय देण्याचा प्रयत्न केला असल्याचे मत प्रसिद्ध वात्रटिकाकार भारत सातपुते यांनी व्यक्त केले. ज्येष्ठ पत्रकार स्व. लक्ष्मीकांत हलकीकर स्मृती सेवागौरव पुरस्काराने उदगीर येथील श्री शंकरलिंग महाराज मठात आयोजित कार्यक्रमात लातूर येथील समाजसेवक बस्वराज पैके यांना ज्येष्ठ साहित्यिक तथा वात्रटिकाकार भारत सातपुते यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे होते. व्यासपीठावर पुरस्कार प्राप्त बसवराज पैके, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. आर. एन. लखोटीया, खरेदी विक्री संघाचे चेअरमन भरत चामले, दक्षिण मध्य रेल्वे बोर्डाचे सल्लागार समिती सदस्य मोतीलाल डोईजोडे, संयोजक विशाल हलकीकर, विक्रम हलकीकर यांची उपस्थिती होती.प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक विक्रम हलकीकर यांनी केले. यावेळी बोलताना भारत सातपुते यांनी प्रत्येकाने आपण ज्या क्षेत्रात काम करीत आहोत त्या क्षेत्रात प्रामाणिकपणे काम केले पाहिजे तरच स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात होणार असल्याचे सांगितले. स्व. लक्ष्मीकांत हलकीकर यांनी त्या काळात आजच्या सारखी डिजिटल पत्रकारिता नसतानाही समाजाच्या कल्याणासाठी पत्रकार म्हणून मोलाची भूमिका बजावली असल्याचे सांगत त्यानीच समाजातील चांगल्या लोकांच्या पाठीशी राहण्याचे काम केले असल्याचे सांगितले. बस्वराज पैके हे स्वतः दिव्यांग असताना आपल्याला जे हाल सोसावे लागत आहेत ते इतर दिव्यांगाच्या नशिबी येऊ नयेत म्हणून ज्या पद्धतीने काम करीत आहेत ते इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे मतही यावेळी सातपुते यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात राहुल केंद्रे यांनी आपल्या राजकीय वाटचालीत पत्रकारांचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. स्व. लक्ष्मीकांत हलकीकर यांनी समाजाचे कल्याण करण्याचा हेतू समोर ठेवून पत्रकारिता केली असल्याचे सांगून बस्वराज पैके यांच्या कार्याचाही त्यांनी गौरव केला. कोरोना काळात पैके यांनी केलेले कार्य मोठे उल्लेखनीय असल्याचे केंद्रे म्हणाले. जिल्हा परिषदेचा अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत आपण दिव्यांगाच्या विकासासाठी केलेल्या कामाचा आलेखही यावेळी राहुल केंद्रे यांनी मांडला.पुरस्काराला उत्तर देताना बस्वराज पैके यांनी आपण भोगत असलेला त्रास इतरांना होऊ नये म्हणून मी दिव्यांगाच्या क्षेत्रात काम करीत आहे, आज उदगीर मध्ये मिळालेला पुरस्कार आपल्याला पुढील कामासाठी अधिक ऊर्जा देणारा असल्याचे मतही यावेळी पैके यांनी व्यक्त केले.

यावेळीशहरातील विविध सामाजिक संस्थेचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यात जिव्हाळा ग्रुप, श्री नवयुवक व्यापारी गणेश मंडळ, श्रीमंत व्यापारी गणेश मंडळ, चला कवितेच्या बनात, पर्यावरण शिक्षण केंद्र एकुरका रोड, साहित्यिक सखी ग्रुप उदगीर, संस्कार भारती शाखा उदगीर, सायकलिंग ग्रुप उदगीर, जिवलग फाउंडेशन निलंगा, स्वराज सेवाभावी संस्था निलंगा, राधाकृष्ण फाउंडेशन निलंगा या सामाजिक संस्थांचा व गोमातेची सेवा करणारे मोहमद इसाक, बॅडमिंटन खेळात देशपातळीवर उदगीर चे नावलौकिक वाढविणारा नागेश भरत चामले, दिल्ली येथे पार पडलेल्या छात्र संसदेत आपली छाप पाडणारी उदगिरची लेक प्राजक्ता भांगे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते बस्वराज पैके यांना शाल, स्मृतिचिन्ह, मानपत्र व रोख पाच हजार रुपये देऊन स्व. लक्ष्मीकांत हलकीकर स्मृती सेवागौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानपत्राचे वाचन अनुराधा धोंड यांनी केले. सूत्रसंचालन अश्विनी देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन विक्रम हलकीकर यांनी मानले. या कार्यक्रमास सामाजिक, राजकीय, साहित्य, शिक्षण, सांस्कृतिक, पत्रकार अशा विविध क्षेत्रातील मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

# कोरोनापेक्षा शंभरपट भयंकर असलेल्या या आजाराचा भारतात शिरकाव

नवी दिल्ली,१२ - यावर्षी एप्रिल महिन्यात 'बर्ड फ्लू' साथीच्या संभाव्य धोक्याबद्दल जागतिक तज्ज्ञांनी धोक्याचा इशारा दिला होता. त्यांनी इशारा दिला होता की, बर्ड फ्लूची साथ ही 'कोविड-१९ पेक्षा शंभरपट भयंकर' असू शकते. तसंच या साथीत संक्रमण झालेल्या रुग्णांच्या एकूण संख्येपैकी अर्ध्यांचा मृत्यू होऊ शकतो. हा इशारा सत्यात उतरताना दिसत आहे. जगातील अनेक देशांमध्ये बर्ड फ्लूचे रुग्ण वाढत आहेत. हा आजार अमेरिका आणि युरोपात मोठ्या प्रमाणात पसरत आहे. हा विषाणू भारतापर्यंत देखील पोहोचला आहे. पश्चिम बंगालमधील एका चार वर्षाच्या मुलाला बर्ड फ्लूची लागण झाली आहे. डब्ल्यूएचओने ही माहिती दिली आहे.

एखाद्या पक्ष्यापासून या मुलाला संसर्ग झाला असावा, असा संशय आहे. संबंधित मुलाचा संपूर्ण आरोग्य तपासणीचा तपशील अभ्यासला जात आहे. बालकाला बर्ड फ्लूची लागण झाल्याची घटना समोर आल्यानंतर आरोग्यतज्ज्ञांची चिंता वाढली आहे. तज्ज्ञांनी लोकांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. भारतात व्यक्तीला बर्ड फ्लूची लागण झाल्याची ही दुसरी घटना आहे. या पूर्वी २०१९ मध्ये एका बालकाला या विषाणूची लागण झाली होती. मात्र, उपचारानंतर रुग्ण बरा झाला होता.

यावेळी देखील लहान मुलाच्या शरीरामध्येच विषाणू आढळला आहे. ज्या मुलाला या विषाणूची लागण झाली आहे त्याला हायपरअॅक्टिव्ह एअरवे आजार असल्याचे निदान झाले आहे. सुरुवातीला त्याला ताप आणि पोटदुखीची समस्या जाणवत होती.

# भगवानदास राठी यांचे निधन



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील व्यापारी भगवानदास राधाकिशन राठी (६१) यांचे मंगळवारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज बुधवारी सकाळी १० वा. मारवाडी स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा,एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. उदगीरचे नामांकित व्यापारी गोविंदलाल राठी यांचे ते बंधू होत.

राठी परिवारावर कोसळलेल्या दुःखात दैनिक यशवंत परिवार सहभागी आहे.

# बलभीमराव कुलकर्णी वळसंगीकर यांचे निधन



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील कृषी विभागातील निवृत्त कर्मचारी बलभीमराव किशनराव कुलकर्णी वळसंगीकर (६८) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज मंगळवारी सकाळी ९ वा बाह्मण स्मशान भूमी फुले नगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आला.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, नातू असा परिवार आहे. कुलकर्णी परिवारावर कोसळलेल्या दुःखात दैनिक यशवंत परिवार सहभागी आहे.

## टी.सी हरवली आहे

ऋतुजा शिवाजी धुळशेट्टे या नावाची इयत्ता १२ वी पासची मूळ टी. सी. व इतर शैक्षणिक कागदपत्रे हरवली उदगीर - मुखेड गाडीने प्रवास करताना हरवली आहेत. सापडल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.
मोबाईल नं. ९४२०११२३४२

## टी.सी हरवली आहे

मेघा शिवाजी धुळशेट्टे या नावाची इयत्ता १२ वी पासची मूळ टी. सी. व इतर शैक्षणिक कागदपत्रे हरवली उदगीर मुखेड गाडीने प्रवास करताना हरवली आहेत. सापडल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.
मोबाईल नं. ९४२०११२३४२

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे. चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १५६/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Dnyanoba S/o Gundaji Padile हे दिनांक ०१.१०.२०२३ रोजी At. Shelhal, Tq.Udgir येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Shantabai W/o. Dnyanoba Padile, Age 70, Occu- H.H.
2) Balaji S/o Dnynoba Padile, Age 54, Occu- Agri.
3) Tulshiram S/o Dnyanoba Padile, Age 52, Occu- Agri.
All R/o. Shelhal, Tq.udgir Dist.Latur

यांनी खालील नमूद १ हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Shantabai W/o. Dnyanoba Padile | 70 | Wife |
| 2) Balaji S/o Dnynoba Padile | 54 | Son |
| 3) Tulshiram S/o Dnyanoba Padile | 52 | Son |

अर्जदार याने Dnyanoba S/o Gundaji Padile या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Dnyanoba S/o Gundaji Padile यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः १३/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १४/०६/२०२४

आदेशावरुन

(डी.ए.कांबळे) कनिष्ठ लिपिक, ३ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय

(दंडणिय विभाग)

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१६/०४/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार शबाना आजमी अब्दुल अजीज शेख रा. जळकोट रोड उदगीर ता.उदगीर यांचा जन्म मौजे उदगीर ता. उदगीर येथे त्यांचा जन्म दिनांक १५/०५/१९७७ रोजी झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार शबाना आजमी अब्दुल अजीज शेख रा. जळकोट रोड उदगीर त्यांचा जन्म दिनांक १५/०५/१९७७ रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक-१९/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक १५/०५/१९७७ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखे पासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार शबाना आजमी अब्दुल अजीज शेख रा. जळकोट रोड उदगीर यांचा जन्म दिनांक १५/०५/१९७७ रोजीची नोंद मुख्याधिकारी,नगर परिषद उदगीर येथे करण्यात येईल.

आज दिनांक १६/०४/२०२४ रोजी दिले
पूढे नेमलेली तारीख १७/०५/२०२४

तालूका दंडाधिकारी तथा,
तहसीलदार उदगीर




## उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो




## उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# ग्रामीण भागात 'कॉपी'वर चालणारी महाविद्यालयांची दुकानदारी बंद करा

## मराठवाडा पालक संघाची मुख्यमंत्री, शिक्षणमंत्र्यांकडे मागणी

लातूर, दि. १२ - बारावीच्या वर्गात प्रवेश देऊन विद्यार्थ्याला चांगले गुण मिळवून देण्याची हमी देत पालकांकडून मनमानी शुल्क उकळणार्या शिक्षण संस्थांचे पेव लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात वाढले आहे. या प्रवृत्तीमुळे गुणवत्तेच्या 'लातूर पॅटर्न'ला काळीमा फासला जात आहे. कनिष्ठ महाविद्यालयाची दुकानदारी बंद करण्याची मागणी मराठवाडा पालक संघाच्यावतीने जिल्हाधिकार्यांमार्फत मुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अशी परीक्षा केंद्रे झुम ऍपद्वारे ऑनलाईन करून विभागीय नियंत्रण मंडळाशी जोडण्याची मागणी करण्यात आली.

लातूर जिल्हा शिक्षणाच्या गुणवत्तेची खाण असल्याची प्रचिती दरवर्षी दहावी - बारावीच्या निकालावरून येत आहे. यामुळे अकरावी - बारावीसह नीट व जेईईचा अभ्यास करण्यासाठी राज्यासह देशभरातील विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात. लातूर शहरात गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. परंतु, लातूर शहरातील महाविद्यालयांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला प्रवेश मिळू शकत नाही. ग्रामीण भागातील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेऊन शहरात खासगी शिकवणी लावण्यासाठी केवळ नावाला प्रवेश घेण्यात येतो. त्याचप्रमाणे बारावीची बोर्ड परीक्षा प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयातील केंद्रावर द्यावी लागते. यात विद्यार्थ्यांना कॉप्या पुरवून त्यांना चांगले गुण मिळवून देतो, असे आश्वासन दिले जाते. सर्रासपणे ग्रामीण कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये कॉपी देऊन उत्तीर्ण करण्याचे प्रकार अनेक परीक्षा केंद्रांवर चालतात. यातून पालकांची अशा महाविद्यालयांकडून आर्थिक लूट होते. या महाविद्यालयांच्या या नव्या दुकानदारीमुळे गुणवत्तेच्या 'लातूर पॅटर्न'ला काळीमा फासला जात आहे. हा प्रकार रोखण्यासाठी परीक्षा नियंत्रण मंडळाने ग्रामीण भागातील परीक्षा केंद्रे झुम ऍपद्वारे ऑनलाईन करावीत, अशी मागणी मराठवाडा पालक संघाच्यावतीने जिल्हाधिकार्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग यांना पाठविण्यात आल्या आहेत. निवेदनावर मराठवाडा पालक संघाचे अध्यक्ष डॉ. भारत घोडके यांची स्वाक्षरी आहे.




# आनंदाचा धागा जोडण्यासाठी मैत्री आवश्यक - प्राचार्य गायकवाड

तुळजापूर (प्रतिनिधी) - प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनामध्ये मैत्रीला अनन्य साधारण महत्त्व आहे. आई वडील आणि मित्र प्रत्येकाच्या जीवनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड यांनी केले.

१९९७ - ९८ वर्षातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळाव्यात ते अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. यावेळी मागासवर्ग आयोग सदस्य डॉ गोविंद काळे, माजी प्राचार्य संजय कोरेकर, प्रभारी माजी प्राचार्य अनिल शित्रे, प्रा.संभाजी भोसले, डॉ आशा बिडकर, प्रा. बी. एन. वाघमारे, डॉ. जे.एन. राजकोंडा, प्रा. सी.एस. काठेवाड, हनुमंत भुजबळ आदी उपस्थित होते. प्रारंभी तुळजाभवानी देवीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक किरण हंगरगेकर, डॉ. शोभा टोले यांनी तर सूत्रसंचालन संजय मैंदर्गी यांनी तसेच स्वागत किरण हंगरगेकर, संतोष मैंदर्गी आनंद कुलकर्णी यांनी केले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी मैत्री ही जीवनामध्ये अत्यंत अनमोल आहे. आई-वडिलांनंतर आपण मित्राचा मानसन्मान करतो. आपल्या मनातील भावना आपण मित्राजवळ बोलून दाखवतो. मैत्रीच्या धाग्याने सर्व जगाला जोडता येते आणि आपले जीवन देखील आनंददायी होते असे त्यांनी सांगितले. या मेळाव्यासाठी वर्षा रत्नपारखे, गीतांजली देवडीकर, सचिन किल्लेदार, आनंद कुलकर्णी, पंकज सावरगावकर, डॉ अमजद खान पठाण, संतोष मैंदर्गी, संजय मैंदर्गी, डॉ शोभा टोले, वैशाली शिंदे, किरण हंगरगेकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन १७ जून रोजी

नांदेड - समकाळातील शिक्षणविषयक समस्या आणि चालू शैक्षणिक वर्षापासून लागू होत असलेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे एस. सी., एस.टी., ओबीसी तसेच धार्मिक अल्पसंख्याक यांच्यावर होणारे परिणाम यासंबंधीचे चिंतन करण्यासाठी नांदेडात एकदिवसीय राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन सोमवार १७ जून २०२४ रोजी करण्यात आले आहे. या परिषदेच्या अध्यक्षपदी भारतीय शोषित पिछडा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष एस. जी. माचनवार हे राहणार असून भारतीय शिक्षण व्यवस्थेचे अभ्यासक फारुख अहमद यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी मराठवाड्यातील सुप्रसिध्द उद्योजक बालाजी इबितदार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



शहरातील शिवाजी नगर येथील नाना नानी पार्क नजिकच्या विसावा पॅलेस कॉन्फरन्स हॉल मध्ये सकाळी १० वा परिषदेचे उद्घाटन होईल. त्यानंतर पीअर फाऊंडेशनचे डॉ. हेमंत कार्ले यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे सत्र संपन्न होईल. या सत्रात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० : हीत कुणाचे? या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील प्रा. डॉ. प्रभाकर गायकवाड आपले अभ्यासपूर्ण विवेचन करतील. भोजन अवकाशानंतर दुपारी २.३० वा. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० आणि उच्चशिक्षण: एक दृष्टिक्षेप या विषयावर यशवंत महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. डॉ. कविता सोनकांबळे ह्या आपले चिंतन मांडणार आहेत. या सत्राच्या अध्यक्षस्थानी फुले - शाहू-आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक तथा लसाकमचे प्रदेशाध्यक्ष बालाजी थोटवे यांची उपस्थिती राहणार आहे. चौथ्या सत्रात दुपारी ४.०० वा प्रश्नोत्तरे, चर्चा तसेच शैक्षणिक संवादाचे आयोजन करण्यात आले आहे. हे शेवटचे सत्र असून या सत्रात परिषदेतील सहभागी शिक्षक प्राध्यापकांच्या प्रश्नांना उत्तरे दिली जातील. यावेळी एस. जी. माचनवार, प्रा. डॉ. प्रभाकर गायकवाड, प्रा. डॉ. कविता सोनकांबळे यांची उपस्थिती राहणार आहे. सदरील परिषदेला पूर्ण वेळ उपस्थित राहण्याचे आवाहन प्रज्ञाधर ढवळे, सतिशचंद्र शिंदे, संजय मोरे, श्रीमंत राऊत, राजेश चिटकुलवार, माधव कांबळे, संजय मोरे, निरंजन तपासकर, पांडुरंग कोकुलवार, मारोती कदम, शंकर गच्चे, बाबुराव कापसे, रविंद्र बंडेवार, दिलीप काठोडे, नागोराव डोंगरे, कैलास धुतराज, रणजित गोणारकर, चंद्रकांत कदम यांच्यासह संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पत्रकारांच्या १० वी व १२ वी गुणवंत पल्यांचा गुणगौरव सत्कार सोहळ्याचे आयोजन

धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) - धाराशिव तालुक्यातील पत्रकारांच्या १० व १२ वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार व्हाईस ऑफ मीडिया धाराशिव तालुक्याच्यावतीने २० जून रोजी करण्यात येणार आहे.

पत्रकार हा समाजाच्या सर्व घटकातील विद्यार्थ्यांचे आपल्या लेखणीतून कौतुक करतात. मात्र पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा ते सत्कार करण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. त्यामुळे पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांच्यामध्ये एक नव चैतन्य निर्माण करण्यासह प्रेरणा देण्यासाठी या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे, नाव नोंदणी दि.१५ जूनपर्यंत तालुक्यातील पत्रकारांनी आपल्या १० वी व १३ वी उत्तीर्ण पाल्याचे नाव नोंदणी तालुकाध्यक्ष अमजद सय्यद संपर्क क्रमांक ८३९००८८७८६ कीवा ९८५००६३००१ यांच्याकडे करावी. हा गुणगौरव सत्कार सोहळा विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असून या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून विविध क्षेत्रातील अधिकारी व उद्योजक आदी मान्यवर हे आवर्जून उपस्थित राहणार आहेत.

त्यामुळे धाराशिव तालुक्यातील सर्व पत्रकारांच्या इयत्ता १० वी व १२ वी मधील उत्तीर्ण झालेल्या पाल्यांचे नाव तात्काळ व्हाईस ऑफ मीडियाकडे कळवावीत. विशेष म्हणजे व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने हा पत्रकारांच्या पाल्यांना प्रोत्साहन देणारा कार्यक्रम प्रथमच आयोजित केला असल्यामुळे जास्तीत जास्त पत्रकारांनी आपल्या पाल्यांसह सहकुटुंब उपस्थित रहावे कार्यक्रमस्थळी स्नेहाभोजन कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले आहे, त्यामुळे जास्तीत जास्त पत्रकारांनी यामध्ये आपण व पाल्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन व्हॉईस मीडियाचे जिल्हाध्यक्ष हुंकार बनसोडे, धाराशिव तालुकाध्यक्ष अमजद सय्यद यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# अपघात भासवून सासऱ्याची हत्या

नागपूर : प्रतिनिधी - नागपूरमधील हिट अँड रन प्रकरण हे घातपाताचे असल्याचा उलगडा झाल्यानंतर यात अनेक धक्कादायक खुलासे होत आहेत. पुरुषोत्तम पुट्टेवार यांची ३०० कोटी रुपयांच्या संपत्तीसाठी सुनेनेच हत्या घडवून आणल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे.

क्लास वन अधिकारी असणा-या अर्चना पुट्टेवार हिने ड्रायव्हरला हाताशी धरून आपल्याच सास-याच्या खुनाची १ कोटी रुपयांची सुपारी दिली. यामध्ये सुनेच्या अधिकारी भावाचाही हात असल्याची माहिती आता समोर येत आहे. या प्रकरणी सुनेसह तिचा भाऊ आणि इतर चौघांना अटक करण्यात आली आहे. पुरुषोत्तम पुट्टेवार यांच्या खून प्रकरणी सहा जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.

पुरुषोत्तम पुट्टेवार यांच्या हत्या प्रकरणी गडचिरोलीत नगरविकास सहायक संचालक असलेल्या अर्चना पुट्टेवार हिच्यासह चालक सार्थक बागडे, नीरज निमजे, सचिन धार्मिक यांना अटक करण्यात आली होती. यात कुणाला सुपारी दिली गेली, कोणाचा हात होता याचा शोध पोलिसांनी घेतला.

पुरुषोत्तम पुट्टेवार हत्या प्रकरणात सून अर्चना पुट्टेवार हिच्या भावाचेही नाव समोर आले आहे. एनएसएमई संचालक असलेल्या प्रशांत पार्लेवार आणि आर्किटेक्ट असणा-या पायल नागेश्वर यांची नावे समोर आली आहेत. पायल ही अर्चनाची सहायक होती. तिच्या माध्यमातूनच हा पैशांचा व्यवहार व्हायचा. बहिणीला तिच्या सास-याचा खून करण्यासाठी प्रशांतने मदत केल्याची माहिती पोलिस आयुक्त डॉक्टर रवींद्र कुमार सिंगल यांनी दिली.

नागपूरमध्ये २२ मे रोजी ८२ वर्षांच्या पुरुषोत्तम पुट्टेवार यांचा कारने चिरडून मृत्यू झाला होता. हिट अँड रन अपघात असल्याचे प्रथमदर्शनी आढळले होते. पण पोलिस तपासात हा खून असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. अपघात असल्याचे भासवून खून करण्याचा कट सुनेनेच रचला होता.

अर्चना ही पुरुषोत्तम पुट्टेवार यांची सून असून पुट्टेवार यांची मुलगी योगिता हिचे लग्न अर्चनाचा भाऊ प्रवीण याच्याशी झाले होते. मात्र प्रवीणचा २००७ मध्ये मृत्यू झाला. यानंतर योगितासोबत तिचे वडील पुरुषोत्तम हे रहायचे. योगिताला पुरुषोत्तम यांच्या संपत्तीतील मिळणारा हिस्सा आपल्याला मिळवता येईल यासाठी पुरुषोत्तम यांच्या खुनाचा कट सून अर्चना आणि तिचा दुसरा भाऊ प्रशांत यांनी रचला होता.

## पान १ वरून

### रायबरेली...

काँग्रेस नेते राहुल गांधींसमोर मोठे संकट आहे की, एक जागा (रायबरेली) हा गांधी घराण्याचा पारंपारिक बालेकिल्ला मानला जातो, तर वायनाडमधील लोक राहुल गांधींच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. अशा परिस्थितीत दोन्ही जागांच्या मतदारांशी त्यांचा थेट संबंध जाणवतो. सध्या राहुल गांधी ज्या जागेवरुन राजीनामा देतील, त्या जागेवरून पोटनिवडणूक होणार आहे. त्यामुळे त्या मतदारसंघातून आपला उमेदवार उभा करून विजय मिळविण्याचा प्रयत्न करण्याची संधी काँग्रेसला आहे.

वायनाडमध्ये बोलताना राहुल गांधी म्हणाले की, या निवडणुकीत द्वेषाचा प्रेमानं पराभव केला आहे. अहंकाराचा पराभव नम्रतेनं होतो. खरं तर वाराणसीतील पराभवातून पंतप्रधान थोडक्यात बचावले हे सत्य आहे. अयोध्येत भाजपचा पराभव झाला, तेव्हा अयोध्येतील जनतेनंही आम्ही हिंसाचार आणि द्वेषाचे समर्थन करत नाही, असा संदेश दिला आहे. मी तुम्हाला सांगू शकतो की, दिल्लीत स्थापन झालेलं सरकार एक अपंग सरकार आहे. विरोधकांनी भाजपला मोठा धक्का दिला आहे. नरेंद्र मोदींचा दृष्टिकोनही बदलेल हे तुम्हाला दिसेल. कारण भारतातील जनतेनं त्यांना संदेश दिला आहे.

राहुल गांधींनी उत्तर प्रदेश च्या रायबरेली लोकसभा जागेवर भाजप उमेदवार दिनेश प्रताप सिंह यांचा ३ लाख ९० हजार ०३० मतांनी पराभव केला होता. तर वायनाडमध्ये राहुल गांधींनी सीपीआय(एम)च्या ॲनी राजा यांचा पराभव केला आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीतही राहुल गांधी यांनी दोन जागांवर निवडणूक लढवली होती, पण अमेठीमध्ये त्यांचा स्मृती इराणींनी पराभव केला होता. यंदाच्या निवडणुकीत राहुल गांधी रायबरेली आणि वायनाड या दोन्ही जागांवर विजयी झाले आहेत. अशा परिस्थितीत त्यांना दोन्ही मतदारसंघांपैकी एक मतदारसंघ निवडावा लागेल. दरम्यान, यावेळी नेहरू-गांधी घराण्याचा बालेकिल्ला समजले जाणारे अमेठी पुन्हा काँग्रेसच्या खात्यात आले आहे. येथून किशोरीलाल शर्मा यांनी स्मृती इराणी यांचा पराभव केला आहे.

### राज्यसभेच्या...

पहिल्यांदाच उतरलेल्या केंद्रीय मंत्री पीयूष गोयल विजयी झाले. उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघात त्यांनी काँग्रेसचे उमेदवार भूषण पाटील यांचा ३ लाख ५७ हजार मतांनी पराभव केला. मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघ भाजपच्या उमेदवारांसाठी सर्वात सुरक्षित मतदारसंघ मानला जातो. साता-यातही राज्यसभा खासदार उदयनराजे यांनी लोकसभेचे मैदान मारले. त्यामुळे त्यांची राज्यसभेची जागाही रिक्त झाली आहे.

या जागा रिक्त

कामाख्या प्रसाद तास (आसाम) , सर्बानंद सोनोवाल (आसाम), मीसा भारती (बिहार), विवेक ठाकूर (बिहार), दीपेंद्रसिंग हुड्डा (हरियाणा), ज्योतिरादित्य शिंदे (मध्य प्रदेश), उदयनराजे भोसले (महाराष्ट्र), पियूष गोयल (महाराष्ट्र), के. सी. वेणुगोपाल (राजस्थान)

बिप्लब कुमार देब (त्रिपुरा).

### मविआ चा...

मतदारसंघासाठी २० अर्ज

उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत कोकण पदवीधर मतदारसंघासाठी २२ अर्ज दाखल झाले होते. मुंबई पदवीधर मतदारसंघामध्ये १० अर्ज दाखल झाले होते, त्यात उद्धवसेना, शिंदेसेना, भाजपच्या उमेदवारांचा समावेश होता. मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी २० अर्ज दाखल झाले होते. यात उद्धवसेना, समाजवादी रिपब्लिकन पार्टी, अजित पवार गट, काँग्रेस, शिंदेसेनेच्या उमेदवारांचा समावेश होता.

### इंदापूरचा...

लोकांशी याबाबत भाष्य करेन. चार महिन्यांनी निवडणुका येतील,आमचा प्रयत्न आहे की काहीही करून सरकार बदलायच आहे. तोवर काही करू शकत नाही. येथील जमीन करायला नरेंद्र मोदी येणार नाहीत. काहीही होऊद्या जमीन करायची. पाणी प्रश्न सोडवा, अशी मागणी आपण करुयात.

सरकार बदलल्याशिवाय आपल्याला पाहिजेत ते निर्णय घेता येत नाहीत

आजच्या घडीला संसार चालवायला, दुधाचा धंदा हा एकमेव धंदा आहे. जेणेकरुन प्रपंच चालतो. सरकार बदलल्याशिवाय आपल्याला पाहिजेत ते निर्णय घेता येत नाहीत. माझ्याकडे १० वर्ष देशाच्या शेतीचे काम होते, त्यावेळी कर्जमाफी केली. शेतीमालाचे भाव वाढवून दिले. सत्तेचा वापर लोकांसाठी करायचे असतो. आज ज्यांच्याकडे सत्ता आहे, त्यांनी मी विनंती करतो, असंही शरद पवारांनी सांगितले.

### लेफ्टनंट...

त्यांनी डीएसएससी वेलिंग्टन आणि आर्मी वॉर कॉलेज महू येथूनही कोर्स केला आहे. द्विवेदी यांना यूएसएडब्लूसी, कार्लिस्ले, अमेरिकेतील प्रतिष्ठित एनडीसी समान पाठ्यक्रमात विशिष्ट फेलोने सन्मानित करण्यात आले आहे.

### येणाऱ्या...

आहे तर कारेपूर येथील सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी लोकसभा निवडणुकीत अटीतटीची लढत असतानाही मनापासून काम केले आणि भाजपाला चांगले मताधिक्य मिळवून दिले. त्याबद्दल दोन्ही गावच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन करून येणाऱ्या काळात होणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत प्रत्येक कार्यकर्त्यांनी एकमेकांच्या विचाराने मन लावून जबाबदारीने काम केल्यास शंभर टक्के यश मिळते यात शंका नाही असे बोलून दाखविले.

भाजपाचे प्रमुख कार्यकर्त्यांनी जबाबदारीने वागून सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करावे, गावातील प्रत्येकाच्या सुखदुः खात सहभागी व्हावे त्याचबरोबर ग्रामस्थांच्या सार्वजनिक आणि वैयक्तिक कामाकडे लक्ष द्यावे अशी सूचनाही यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड यांनी केली.

यावेळी रामवाडी येथील सरपंच पांडुरंग कलूरे, उपसरपंच करण सुरवसे, शालिकराम गोडभरले, भूषण उगले, नामदेव गोडभरले, गणपती कोलपाक, भीमराव दिवटे, सूर्यकांत सुरवसे संजय गोडभरले, पुंडलिक दिवटे, ज्ञानेश्वर गोडभरले, नितीन गोडभरले, मधुकर गोडभरले आणि कारेपूर येथील भाजपाचे भाऊसाहेब गुलबिले, माजी सरपंच दगडू महाराज पुरी, माजी सरपंच राजेश काळे, ओमकारआप्पा क्षीरसागर, शंकर माने, चांद शेख, धोंडीराम ठोंबरे, ऋषिकेश गायकवाड, माणिक सुरवसे, प्रकाश साळवे, सुरज पल्ले, ओम चव्हाण, बाबासाहेब साळवे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

### बोगस खते...

कृषी विभागाने मार्गदर्शन करावे. जिल्ह्यात फळबाग लागवड, बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, अशा सूचनाही यावेळी जिल्हाधिकारी ठाकूर यांनी केल्या.

### चंद्राबाबू...

विधानसभा निवडणुकीत माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्या वायएसआर काँग्रेसला धूळ चारली आहे. विधानसभा निवडणुकीत नायडूंच्या टीडीपीने १७५ पैकी १३५ जागा जिंकल्या. तर पवन कल्याण यांच्या जनसेना पार्टीने २१ जागांवर विजय मिळवला. यासह भाजपाला आठ जागा जिंकता आल्या. तिन्ही पक्षांनी मिळून राज्यात १६४ जागा जिंकल्या. तर, जगन मोहन रेड्डींच्या वायएसआर काँग्रेसला केवळ ११ जागा जिंकता आल्या.

विजयवाडा येथे मंगळवारी एनडीएच्या सर्व आमदारांची बैठक झाली. या बैठकीत चंद्राबाबू नायडू यांची एनडीएचे गटनेते म्हणून निवड झाली. त्यानंतर आज त्यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. नायडू यांच्याबरोबर एनडीएतील एकूण २४ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यामध्ये टीडीपीचे २०, जनसेना पार्टीचे २१ आणि भाजपाच्या एका नेत्याचा समावेश आहे.

आंध्र प्रदेशच्या नवीन कॅबिनेटमधील मंत्र्यांची नावे कोनिडेल पवन कल्याण, किंजरापू अच्छेनायडू, कुल्ली रवींद्र, नादेंदल मनोहर, पी. नारायण, वंगलपुडी अनिता, सत्यकुमार यादव, निम्मल रामानायडु, एन. एम. डी. फारुक, अनम रामनारायण रेड्डी, पयावल्लु केशव, अंगनी सत्यप्रसाद, कुलुसु पार्थसारधी, डोला बलवीरंजनेय स्वामी, गुट्टीपट्टी रवी, कंदुल दुर्गेश, गुम्मिडी संध्या राणी, जनार्दन रेड्डी, टीजी भरत, वसंतमशेट्टी सुभाष, कुण्डपल्ली श्रीनिवास, मण्डीपल्ली राम प्रसाद, नारा लोकेश.

**DECLARATION CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM PATEL MASRATH BEGUM SAJID TO PATEL MASARTH BEGUM MOHAMMAD SAJID HENCE FOR THIS DECLARATION. AND IN FUTURE I WILL USE MY NEW NAME PATEL MASARTH BEGUM MOHAMMAD SAJID. ALSO, IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY.

**OLD NAME**

PATEL MASRATH BEGUM SAJID

**NEW NAME**

PATEL MASARTH BEGUM MOHAMMAD SAJID

**ADDRESS**

RIYAZ COLONY, AMBAJOGAI ROAD, LATUR – 413512

**जाहीर प्रगटन (नावात बदल)**

या प्रगटनद्वारेजाहीर करण्यात येतेकी माझ्या कागदोपात्रावर नाव SHAIKH AKBAR SHAIKH HASAN माझ्या इतर कागदोपात्रीवर माझेनाव AKBAR SHAIKH HASAN असेआहे. यापुढील माझ्या खाजगी व कायदेशीर व्यवहारात माझेहेच नवीन SHAIKH AKBAR SHAIKH HASAN घेईन . याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**जुने नाव:-**AKBAR SHAIKH HASAN

**नवीन नाव :-** SHAIKH AKBAR SHAIKH HASAN

**ADDRESS**

BISTI GALLI AHMADPUR DIST LATUR 413515

**महत्वाची कागदपत्रे हरवली आहेत**

माऊली बहु उद्देशिय सेवाभावी संस्था, निळकंठ, ता. जि . लातूर या संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र ( क्रमांक एफ - २१७७७ ( लातूर ), नोंदणी क्रमांक महा - / ३७९/ १२ प्रमाणपत्र व याच संस्थेचे पॅनकार्ड ( AAETM5894Q) ही महत्वाची कागदपत्रे शिवाजी चौक लातूर ते मुरुड अकोला पर्यंतच्या प्रवासात हरवली आहेत. ज्या कोणास सापडली असल्यास त्यांनी कृपया पुढील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क**

माऊली बहुउद्देशिय सेवाभावी संस्था गोरक्षण, लातूर - बार्शी रोड, साखरा. ता. जि . लातूर.

**मोबाईल नंबर : ९९२३० ५८६४५.**

**जाहीर प्रगटन (नावात बदल)**

या प्रगटनद्वारेजाहीर करण्यात येतेकी माझ्या कागदोपात्रावर नाव HUDA BABY AKBAR SHAIKH माझ्या इतर कागदोपात्रीवर माझेनाव HUDA BABY AKBAR असेआहे. यापुढील माझ्या खाजगी व कायदेशीर व्यवहारात माझेहेच नवीन HUDA BABY AKBAR SHAIKH घेईन . याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**जुने नाव:-**HUDA BABY AKBAR

**नवीन नाव :-** HUDA BABY AKBAR SHAIKH

**ADDRESS**

BISTI GALLI AHMADPUR DIST LATUR 413515


**कल्याण बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

**मिलन नाईट बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**

स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69 98 98 20 38 88

**नशिबाची परिक्षा**

गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे**

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

**कल्याणम**

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |


संपर्क 99 75 47 98 26

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर**
**नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
| --- | --- |
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.





# यशवंत

गुरुवार दि. १३ जून २०२४

पान ८

# उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
| --- | --- | --- |
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन बांधकामासाठी १२ कोटी रुपयांचा वाढीव निधी - ना. संजय बनसोडे

**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर शहरातील नागरिकांची मागणी लक्षात घेवुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने उभारण्यात येत असलेल्या म छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवनासाठीफ राज्य शासनाच्या नगर विकास विभागाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत वाढीव १२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यापूर्वी या सांस्कृतिक भवनासाठी ९ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता आता यामध्ये आणखी १२ कोटी रूपयाचा निधी वाढवण्यात आला असुन एकुण २१ कोटी रुपयाचा निधी छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवनासाठी मंजूर केला असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली.



उदगीर शहर हे अलिकडे एक सांस्कृतिक शहर म्हणून नावारूपाला येत आहे. तीन राज्याच्या सीमेवर असलेल्या या शहराला एक सांस्कृतिक ओळख देण्यासाठी या भागाचे आमदार तथा महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे हे परिश्रम घेत आहेत. मागील काळात उदगीर शहरांमध्ये अखिल भारतीय साहित्य संमेलन, मराठी बाणा, चला हावा येऊद्या फफ्रेम हास्यकल्लोळ कार्यक्रम, जगप्रसिध्द गायक अजय - अतुल व अवधूत गुप्ते यांच्या संगीत मैफिफ्रलीसह विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी उदगीर शहराला सांस्कृतिक शहर म्हणून महाराष्ट्रात नावारुपाला आणले आहे.

या भागातील नागरिकांना सांस्कृतिक मेजवानी मिळावी व यासाठी सुसज्ज अत्याधुनिक पद्धतीच्या सांस्कृतिक भवनाची गरज लक्षात घेऊन क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी उदगीर शहरात नाट्यगृहाची उभारणी सुरू केली आपल्या परिसरातील नागरिकांना सर्व सुविधायुक्त नाट्यगृह उपलब्ध व्हावे व या भागातील रसिकांना सांस्कृतिक मेजवानी मिळावी म्हणून राज्य शासनाकडून १२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेऊन उदगीर करांचे व या भागातील कलावंतांचे स्वप्न क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी पूर्ण केल्याने कलावंत, रसिक व सांस्कृतिक प्रेमी नागरिकांनी ना. संजय बनसोडे यांचे अभिनंदन करुन आभार व्यक्त केले आहेत.

# आज उदगीर येथे संजय बुक्का पाटील यांचे व्याख्यान

**उदगीर (प्रतिनिधी)** चिन्मय मिशनद्वारा आयोजित उदगीर येथे आज संजय बुक्का पाटील यांचे अद्वैत् वेदान्त-तत्वबोध या विषयावर व्याख्यान होणार आहे.

चिन्मय मिशन आश्रम निडेबन येथे अमेरिकेत गत २५ वर्षापासुन स्थायीक असलेले व मुळ उदगीर येथील संजय बुक्का पाटील यांचे अद्वैत् वेदान्त-तत्वबोध या विषयावर व्याख्यान आज गुरुवार दि. १३ जुन ते १७ जुन २०२४ पासुन रोज दुपारी ४ ते ५ दरम्यान चिन्मय मिशन आश्रम निडेबन रोड, उदगीर येथे आयोजित करण्यात आले आहे.



संजय बुक्का पाटील यांनी आयआयटी मद्रास येथुन एम.टेक. चे शिक्षण घेवून मल्टीनॅशनल कंपनीत वरिष्ठ पदावर कार्य केले आहे. भारतीय दर्शनशास्त्र तसेच संस्कृत भाषा या विषयावर गत १५ वर्षापासुन त्यांचा अभ्यास चालु आहे. अद्वैत् वेदान्त हा भारतीय दर्शनशास्त्रात उच्च कोटीचा सिध्दांत मानला जातो. समजायला सोपा पण अचरणात आणायला खुप अवघड असल्यामुळे या विषयाची प्राथमिक सिध्दांत समजुन घेवून आपल्या दैनंदिन जीवनात अचरणात आणणे महत्वाचे आहे. ही गरज ओळखुनच अदिशंकराचार्य यांनी तत्वबोध नावाचा लघुग्रंथ रचला आहे. पाच दिवसात दररोज अद्वैत् वेदान्त-तत्वबोध या विषयावर १ तासाचे व्याख्यान होणार आहे.

तरी या अमुल्य अशा बौध्दीक व्याख्यानाचा जनतेने उपस्थित राहुन लाभ घ्यावा असे आवाहन सौ. मालती कुलकर्णी व शैलेष अंबरखाने यांनी केले आहे.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २६ वा वर्धापन दिन साजरा




**उदगीर (प्रतिनिधी)** येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफफ्र नर्सिंग येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २६ वा वर्धापन दिवस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ.सुधीर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. सुरूवातीला नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या ज्योती तारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी संस्थेच्या व्यवस्थापिका ज्योती स्वामी, जय हिंद पब्लिकस्कूलचे प्राचार्य संजय हट्टे, फफ्रार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. गणेश तोलसरवाड, स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. धनंजय गोंड यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील वर्धापन दिवस व वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. प्रिंसी बी, प्रा. स्वाती यवडगे, प्रा. संगीता सगर, प्रा. शिल्पा कवठे, प्रा. दिपाली ठोके, प्रा. वैष्णवी मोरे, प्रा. सोमेश्वर सुर्यवंशी, शकुंतला सोनकांबळे, कदम बालाजी, नरसिंग जानके, पवळे सुरेश, रत्नदीप मोरे, शेख सादीक, योगेश काळे, बाबुराव पोटे यांनी परिश्रम घेतले.

# विद्यावर्धिनी हायस्कूलात प्रेरणा कपाळेचा गौरव



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर द्वारा संचलित विद्या वर्धिनी हायस्कूल उदगीर उदगीर या शाळेची ज्ञानवंत, प्रज्ञावंत, किर्तीवंत दहावी बोर्ड परीक्षेत १०० पैकी १०० टक्के गुण मिळवणारी माजी विद्यार्थिनी कु. प्रेरणा बालाजी कपाळे हिने पुन्हा एकदा वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता एन .टी .आय कडून घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पात्रता तथा प्रवेश परीक्षा नीट - युजीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करत ७२० पैकी ६६२ गुण मिळवून शाळेचे आई-वडिलांचे नावलौकिक केल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने प्रेरणाचा शाल ,पुष्पहार घालून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. प्रेरणाचे वडील वकील असून आई आशाराणी गृहिणी आहे. तिने आमच्या प्रतिनिधीशी बोलताना प्रेरणा म्हणाली की, मला वैद्यकीय क्षेत्रातच करिअर करायचे होते, हे मी आधीपासूनच ठरवले होते.या यशामागे विद्यावर्धिनी हायस्कूल उदगीर या शाळेचा तिने आवर्जून उल्लेख केला आहे.यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही. एम बांगे ,सुधाकर बत्तीनवार, कला शिक्षक एन.आर जवळे, ग्रंथपाल क्रांती पाटील, योगेश पाटील, व्यंकट वाघमारे, सविता गौरशेट्टे, मोहन विभुते, महेबूब शेख यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची यावेळी उपस्थिती होती.

# अशासकीय समित्यांच्या नियुक्त्या रखडल्याने हाळी-हंडरगुळी येथील महायुतीचे कार्यकर्ते रुसले ; नाराज कार्यकर्ते प्रचारात अलिप्त राहिले

**उदगीर (प्रतिनिधी)** राज्यातील महायुतीचे सरकार सत्तेत येऊन २ वर्षाचा काळ होत आला तरी पण उदगीर तालुकास्तरीय संगायो - इंगायो, रोहयो, विद्युत व अन्न पुरवठा , दक्षता, यासारख्या समित्यांची घोषणा

अद्यापही पालकमंञ्याने केलेली नाही यामुळे महायुतीतील कार्यर्ते नाराज झाले आणि लोकसभेच्या प्रचारात रुसुन बसल्याने याचा फफ्रटका भाजपा उमेदवारास बसला आहे. अशी चर्चा हाळी-हंडरगुळीत सुरु आहे. तसेच ४० टक्के भाजपा तर ३० टक्के शिंदे व ३० टक्के अ.प.गट या सुत्रावरुनच विविध प्रकारच्या शासकिय आणि निमशासकिय समित्यांच्या नियुक्त्या रखडल्याचे ही बोलले जात असले तरीही आगामी विधानसभा आणि त्याचा शिल्लक कालावधी लक्षात घेता या रखडलेल्या निवडी भाजपाचे संकट मोचक तथा जिल्ह्याचे पालक मंत्री असलेले गिरीष महाजन हे या निवडी करतील ! अशी भाबडी आशा महायुतीच्या कार्यकर्त्यांना आहे.

रा.काँ.चा एक गट सत्तेत सहभागी झाल्यानंतर कुठे , कोणता पालक मंत्री होणार.या निवडीसाठी बराच कालावधी वाया गेला.आणि एकदाचे पालकमंत्री जाहीर झाले. त्यात ही या भागाच्या आमदारास नामदार केले खरे मात्र पालकमंत्री केले खान्देशी आमदाराला. आणि या पालकमंत्री महोदयाने केवळ जिल्हा नियोजन वगळता उदगीर तालुक्यातील वरील समित्या अद्यापही जाहीर केले नाही. म्हणुन आम्ही काय फक्त सतंरज्याच उचलायच्या का असा सवाल विविध समिती मध्ये सदस्य म्हणुन जाण्याची आशा बाळगुन बसलेले महायुतीतील धडपड्या कार्यकर्त्यांतुन उपस्थित केला जात आहे.तसेच समित्यावरील अशासकीय सदस्यांची निवड अद्यापही झाली नसल्याने रुसलेले कायकर्ते लोकसभेच्या प्रचारात दिसले नाहीत. व याचा कांहीअंशी फफ्रटका भाजपास बसल्याचे तसेच असाच फफ्रटका येत्या आमदारकीला बसु नये,यासाठी या रखडलेल्या निवडी करा. असे कट्टर व मतदारात वट असलेल्यांत बोलले जाते.

# एकच पर्व ओबीसी सर्व या संकल्पनेतुन जळकोट येथे रॅली




**जळकोट (प्रतिनिधी)** छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रा मध्ये व साधुसंताच्या संस्काराने चालनारा हा गावगाडा या महाराष्ट्राची शान आहे किंबहुना ताकद आहे . याच ताकदीला काही नतद्रष्ट लोकीची नजर लागल्याने व अशाच लोकांकडून गावखेड्यातील छोट्या छोट्या समुहावरती / जातीवरती अतिशय खालच्या स्तरावर शाब्दिक हाल्ले केले जात आहेत . त्यामुळे ही कृती काही जातीयवादी खालच्या स्तरावर बोलून हिनवत आसुन समाजात जातीय तेढ निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यामुळे येथील जातीयवाद करून छोट्या जातीय समूहातील लोकावर धोक्याची घंटा आहे त्यासाठी तहसिल प्रशासनाने अशा जातीय तेढ निमर्ाण करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्याच्या मुसक्या वेळीच आवळल्या नाहीतर आराजकता माजेल असे तहसिलदार सुरेखा स्वामी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे . तसेच छत्रपत्री शिवाजी महाराज चौक ते तहसिल कार्यालय जळकोट येथे एकच पर्व ओबीसी सर्व या संकल्पनेतुन रॅलीचेही आयोजन करण्यात आले होते.

निवेदनावर रत्नाकर केंद्रे , राहुल मुसळे , विठ्ठल तिडके , बाबुराव गुट्टे , श्रीहारी केंद्रे आदीच्या स्वाक्षऱ्या असून यावेळी सरपंच धर्मपाल देववट्टे , सरपंच प्रा. चोले, बालाजी केंद्रे, राम चोले आदी उपस्थित होते.

# लातूर जिल्हा सोनार समाज कार्यकारणी जाहिर





**उदगीर (प्रतिनिधी)** लातूर जिल्हा सोनार समाज सेवा संघ (म) शाखा उदगीर या तालुका कार्यकारणीची बैठक शुक्रवार दि. ०७ जुन २०२४ रोजी संपन्न झाली.

या बैठकीच्या अध्यक्ष पंडित नरेंद्र सुरेशराव हे होते. तर या बैठकीत नवीन तालुका कार्यकारणीची निवड करण्यात आली. यात अध्यक्ष दिक्षीत अनंत त्र्यंबकराव, उपाध्यक्ष बारस्कर यशवंत गंगाधरराव, सचिव मेंढापुरकर चंद्रकांत बाबुराव, सहसचिव महामुणी आनंद विजयकुमार, कोषाध्यक्ष महामुणी सुशील उमाकांतराव, सहकोषाध्यक्ष दिक्षीत दिनेश दिपकराव, सल्लागार पोतदार वसंत मुकूंदराव, सदस्य पंडित जयदीश कमलाकर, बावगे बालाजी वैजनाथराव, सौ. पंडित उमा रमेशराव, दिक्षीत मनिषा संजय, पंडित नरेंद्र सुरेशराव, बावगे शिवाजी मारोतीराव, पंडित किशोर मधुकरराव, पोतदार कान्तराव दत्तात्रय यांनी सर्वानुमते निवड करण्यात आली.